
# प्रकरण पहिले

## श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक : जीवन व कार्य



# प्रकरण पहिले

# श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक : जीवन व कार्य

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती, महात्मे व संत होऊन गेले. त्यात संत गाडगेबाबांचा क्रम वरचा आहे. कोणताही गाजावाजा, गुरू शिष्यांचा गोतावळा किंवा स्वतंत्र संप्रदाय निर्माण न करता केवळ आपल्या आचरणाने व कीर्तन या सर्वमान्य माध्यमाद्वारे समाजसुधारणा घडविण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी केला. समाजातील अज्ञान, अयोग्य व घातक सवयी, अनिष्ठ सामाजिक व धार्मिक परंपरा यांच्यावर आघात करण्याचे कार्य त्यांनी आपल्या कीर्तनाद्वारे केले. अखंड परिश्रमाद्वारे दीन-दुबळंयाना, गोरगरिबांना मदत केली. आपल्या कृतीने समाजासमोर असामान्य त्यागाचे चित्र उभे केले. विचारांचा गोंधळ न करता सरळ पद्धतीने नितीविचार समजावून तो विचार आचरणात आणणारे गाडगेबाबा हे अलौकिक व्यक्तिमत्व होते. धर्म सांगायचा नसतो, तो जगायचा असतो असे सांगणारे व सतत ५० वर्षे जनसामान्यांचे कृतीद्वारे प्रबोधन करणारे गाडगेबाबा हे एक थोर मानवतावादी संत होते.

**श्री संत गाडगेबाबांचा अल्पपरिचय : (इ.स.१८७६-१९५६)**

गाडगेबाबा उर्फ डेबूजी झिंगराजी जाणोरकर (वट्टी) यांचा जन्म २३ फेब्रुवारी, १८७६ रोजी अमरावती जिल्हयात दर्यापूर तालुक्यातील शेणंगाव येथे परीट समाजात झाला. माता सखुबाई या हंबीरराव परीट यांच्या कन्या होत्या.[१] गाडगेबाबांचे वडील शिक्षणाअभावी अंधश्रद्धा व दारूच्या व्यसनाहारी गेले होते. त्यातच त्यांचा इ.स.१८८४ मध्ये मृत्यू झाला.[२] त्यावेळी गाडगेबाबा फक्त ८ वर्षाचे होते. वडील झिंगराजीच्या मृत्यूनंतर माता सखूबाई गाडगेबाबांना घेऊन दापुरे या भावाच्या गावी गेल्या. त्यानंतरचे गाडगेबाबांचे बालपण मामांच्या छायेत आणि आईच्या मायेत गेले. त्यांनी सुरूवातीस मामांची गुरे राखण्याचे काम केले. मामांच्या घरची परिस्थिती चांगली

होती.[३] त्या काळात बालवयात लग्न करण्याची प्रथा होती. या प्रथेप्रमाणे त्यांच्या मामाने गाडगेबाबांचे लग्न वयाच्या १६ व्या वर्षी कमलापूर या गावच्या धनाजी (परीट) खल्लारकर यांची मुलगी कु.कुंताबाई हिचे बरोबर इ.स.१८९२ मध्ये केले. त्यावेळी कुंताबाई अवघ्या सात वर्षाच्या होत्या.[४]

दरम्यानच्या काळात गाडगेबाबांचे मामा चंद्रभानजी यांची त्यांच्याच दापुरे गावी राहणाऱ्या बनाजी तिडके या गर्भश्रीमंत सावकाराशी मैत्री झाली. उत्तरोत्तर मैत्री वाढत गेली. त्यामुळे त्यांचे मामा चंद्रभानजी सावकाराकडून पैसे घेऊ लागले. त्याचे व्याज वाढत गेले. सावकाराने खोटे हिशोब दाखविले, चंद्रभानजीला सावकारी पाशात अडकविले. त्यात चंद्रभानजीची ५६ एकर जमीन कर्जापोटी गहाणपत्राने सावकाराच्या ताब्यात गेली. हे दु:ख व मानहानी विसरण्यासाठी मामांनी दारूचे व्यसन जवळ केले. त्यातच त्यांचा १८९६ मध्ये मृत्यू झाला. गाडगेबाबांवर वडीलांच्या निधनानंतर आलेले हे दुसरे मोठे संकट होते.[५]

मामांच्या मृत्यूनंतर घरात असलेले वयोवृद्ध आजोबा हंबीरराव, (आईचे वडील) आधार तुटलेली मामी कौतिकाबाई, तिचा लहान मुलगा बळीराम, धर्मपत्नी कुंताबाई व मातोश्री सखुबाई यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी गाडगेबाबांच्यावर आली. कारण घरात कर्ता पुरूष फक्त गाडगेबाबाच होते. डोईवर सावकारी कर्ज होते.[६]

गाडगेबाबांनी सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी खूप कष्ट सुरू केले. घरचा संसार चालवून उरलेले उत्पन्न ते सावकारचे देत. त्याचा चोख हिशोब ठेवत. त्यांच्या हिशोबाप्रमाणे सावकारी देणे देऊन भागून उलट सावकाराकडे येणे उरत होते पण सावकाराने हिशेबाच्या आकडयाची उलटा पालट करून त्यांची सगळी शेती गिळंकृत करणारा आकडा गाडगेबाबांपुढे टाकला. 'हा आकडा खोटा आहे, मी मानत नाही' असे त्यांनी सांगितले यातून सावकार व गाडगेबाबा यांच्यात संघर्ष निर्माण झाला.[७]

गाडगेबाबा शेत नांगरत असताना सावकरांनी त्यांच्यावर भाडोत्री मारेकरी काठया-कुऱ्हाडी घेऊन पाठविले. त्यांच्यात मारामारी होऊन गाडगेबाबांनी गुंडांना लोळविले. गुंड पळून गेले. हे पाहून बनाजी तिडके हा सावकार घाबरला. त्याने गाडगेबाबांची क्षमा मागितली. यानंतर तो कर्जासाठी म्हणून कधीही गाडगेबाबांच्याकडे आला नाही. गावात गाडगेबाबांचा मानसन्मान वाढला, चिंता मिटली, कर्ज फिटले,घराला घरपण आले.[८]

दरम्यानच्या काळात म्हणजे १९०२ साली अलोका (जन्म-१८९९) आणि कलावती (जन्म-१९००) या दोन मुलींच्या पाठीवर मुदगल या मुलाचा जन्म झाला. तो अल्पायुषी ठरला. इ.स.१९०५ साली चौथे अपत्य गोविंदचा जन्म झाला.[९]

**संसारत्याग :**

इ.स. १९०५ साली वयाच्या २९ व्या वर्षी गाडगेबाबांनी संसाराचा त्याग करून १९१७ पर्यत म्हणजे १२ वर्षे साधक अवस्थेत अज्ञातवासात काढली. या काळात कुठेही रानावनात, दगड धोंडयात झोपावे लागले, अनेकदा अन्न पाण्याशिवाय राहावे लागले. लोकांनी चोर म्हणून दगड काठयाने मारले, महार-मांग म्हणून गावातून हाकलून लावले. परंतु कोणाचाही त्यांनी प्रतिकार केला नाही. मदतीची याचना केली नाही. कष्टाविना मदत घेतली नाही. अशा साधक अवस्थेत गाडगेबाबांनी काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, लोभ या षडरिपुंवर विजय मिळवून ते जितेंद्रिय बनले. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. लोकांची नि:स्पृह सेवा करण्याचा चंग बांधला.[१०]

गाडगेबाबा संसारत्याग करून गेल्यानंतर घरात कोणीच कर्ता पुरूष उरला नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची त्रेधा उडाली. त्यातच वृद्ध आजी (आईची आई) रायजाबाई वारली. शेवटी वर्षानंतर ऋणमोचन येथील यात्रेत माता सखुबाई व गाडगेबाबांची भेट झाली. त्यावेळी गाडगेबाबा यात्रेतील घाण खराटयाने काढत होते.एकाच कानात अडकवलेली काचेची अर्धी बांगडी, चिंध्यांनी झाकलेला देह, डोक्यावर अर्धवट फुटलेले खापर अशी त्यांची बैरागी वेशभूषा होती. त्यांच्या आईने

गाडगेबाबांना घरी येण्याची विनवणी केली. परंतू गाडगेबाबांनी त्यास नकार दिला व आपले जनसेवाव्रत्त तसेच पुढे चालू ठेवले.[११]

संसार त्यागामुळे मुलांची आबाळ वाढली. मुलगा गोविंद याला गाडगेबाबांच्या भक्तांनी पुण्याला शिक्षणासाठी ठेवले होते. तेथे तो गाडगेबाबांच्या सांगण्यावरून माधुकरी मागून शिकत होता. तो इयत्ता चौथीत शिकत असताना पिसाळलेले कुत्रे चावले. त्यातच त्याचा ५ मे १९२३ रोजी मृत्यू झाला. त्या दिवशी गाडगेबाबांचे कीर्तन रत्नागिरी जिल्हयातील खारेपाटण या गावी सुरू होते. गाडगेबाबांचे कीर्तन सुरू असताना एका व्यक्तीने मुलाच्या मृत्यूची बातमी सांगितली. थोडावेळ स्तब्ध उभे राहून त्याच व्यक्तीचे गाडगेबाबांनी सांत्वन केले. पुढे म्हणाले, "बाप हो, राम गेले, कृष्ण गेले, छप्पन कोटी यादव गेले...

ऐसे गेले कोटयानुकोटी |
काय रडू एकासाठी ||

मुलाच्या अंत्यविधीसही गाडगेबाबा हजर नव्हते. यावरून असे दिसून येते की जनसेवेसाठी त्यांनी स्वत:च्या मुलाचाही विचार केला नाही.[१२] नंतरच्या काळात धर्म पत्नी कुंताबाईस मुर्तिजापूर येथील गोरक्षणाच्या जागेत एक झोपडी बांधून दिली. त्यात त्यांना आयुष्य काढावे लागले. अंगभर चांगले वस्त्र कधी मिळाले नाही. कष्ट करून माधुकरी मागून उदरनिर्वाह करावा लागला. ज्या सत्पुरूषाने लाखो रूपयांच्या संस्था स्थापन केल्या त्याच्या धर्मपत्नीस व मुलांना मोलमजूरी करून आयुष्य काढावे लागले हे विशेष मानावे लागेल.[१३]

गाडगेबाबांनी ५० वर्षाच्या भटकंतीत कीर्तनाच्या माध्यमाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले. धर्मशाळा, गोरक्षण संस्था, वृद्धाश्रम, पाणपोई बांधल्या. 'श्री गाडगे महाराज मिशन' या सेवाभावी संस्थेची त्यानी स्थापना केली. तीर्थक्षेत्री साफ-सफाई करून बहुजन समाजाची सेवा केली. या ५० वर्षाच्या जनसेवेत त्यांनी असंख्य यातना भोगल्या. त्यात पोटाची, खाण्याची, राहण्याची आबळ झाली, आजारी

पडले तरी जनसेवा सुरू ठेवली. सन १९५१-५२ पासून त्यांच्या प्रकृतीच्या किरकोळ तक्रारी सुरू झाल्या. हळूहळू प्रकृती ढासळू लागली. [१४]

त्यांच्या आजारपणाच्या बातम्या येऊ लागल्या. त्यावेळी त्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी पत्र पाठविले. "आपल्यासारख्या महान, त्यागी, नि:स्पृह व जनहितैषी सेवकाची भारताला अत्यंत जरूरी आहे." अशी भावना व्यक्त करून प्रकृतीस आराम पडावा अशी प्रार्थना केली. इतर अनेकांनी पत्रे पाठविली. खूप आजारी असल्याने ते १९५५ साली आषाढी वारीस पंढरपूरला गेले नव्हते. नामदार तपासे व मालोजीराजे निंबाळकर या मंत्र्यांनी त्यांना आग्रह करून मुंबईला सेंटजॉर्ज हॉस्पिटलमध्ये ठेवले. पण ते तिथेही फरशीवर झोपायचे, नेहमीचाच आहार घ्यायचे, त्यांच्यासाठी आणलेले फळफळाव गोर-गरिबांना वाटायचे. दवाखान्यातूनच पत्र व्यवहार करायचे, स्थापन केलेल्या संस्थांची व्यवस्था बघायचे. शेवटच्या दीड वर्षात गाडगेबाबांना मृत्यूची झालेली जाणीव प्रथम कोल्हापूरच्या एका हितचिंतकाच्या घरी गेल्यावर त्यांनी बोलून दाखविली, जिथे जिथे लोकांच्या भेटी-गाठी होत त्यावेळी 'ही आता आपली शेवटची भेट आहे' असा विचार ते बोलून दाखवत. दरम्यानच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूची बातमी त्यांना समजली आणि त्यामुळे ते फार व्यथित झाले. [१५]

दि. २० डिसेंबर १९५६ रोजी रात्री १२ वाजून २० मिनिटांनी लाखो लोकांचे जीवन फुलविणाऱ्या कर्मयोगी गाडगेबाबांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला.

गाडगेबाबांच्या मृत्यूनंतर त्यांचा अत्यसंस्कार कोठे करावा, कोणी करावा यावर वादावादी होऊन त्यांचा अंत्यसंस्कार अमरावतीस राठोड बंगल्याच्या जवळ त्यांचा नातू वासुदेव सोनवणे (मुलीचा मुलगा) यांनी केला. यावेळी महाराष्ट्रातील शेकडो नामवंत हजर होते. त्यांच्या अस्थी तापी नदीमध्ये समर्पित करण्यात आल्या. [१६]

## गाडगेबाबांची शिकवण, संदेश व कृती :

संत गाडगेबाबा हे कृतीशील संत होते. समाजामध्ये वावरताना आलेल्या स्वानुभवातून त्यांच्या शिकवणीचा, संदेशाचा व कृतीकार्याचा उगम झालेला होता. त्यांची



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शिकवण व संदेश समाजाच्या उद्धारासाठीच होते आणि आहेत.

गाडगेबाबा म्हणायचे -

"माय बाप हो! देव तीर्थात नाही, मूर्तीत नाही, तो तुमच्यासमोर दरिद्री नारायणाच्या रूपाने उभा आहे. त्याचीच जीवाभावाने सेवा."

१. भुकेलेल्यांना - अन्न द्या.

२. तहानलेल्यांना - पाणी द्या.

३. उघड्या - नागड्यांना - वस्त्र द्या.

४. बेघरांना - आसरा द्या.

५. गोर - गरीब मुला-मुलींना - शिक्षण द्या.

६. बेकारांना - रोजगार द्या.

७. अंध - पंगू - रोग्यांना - औषधोपचार द्या.

८. पशुपक्षी मुक्या प्राण्यांना - अभय द्या.

९. दु:खी निराशांना - हिंमत द्या.

१०. गरीब तरूण तरूणींचे - लग्न करून द्या.

हाच खरा रोकडा धर्म आहे, हीच खरी देवपूजा आहे, हीच खरी भक्ती आहे.[१७]

वरील संदेशालाच गाडगेबाबांचा १० कलमी संदेश, शिकवण व कृती कार्य क्रम म्हणतात. या संदेशानुसार कार्य करण्यासाठी हयातभर स्थापन केलेल्या संस्थांना संघटितरूप देऊन आपले कार्य अखंडपणे चालविण्यासाठी गाडगेबाबांनी दि.८ फेब्रुवारी १९५२ रोजी 'श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई - ४' ही सेवाभावी संस्था स्थापन केली व ती इ.स.१८६० च्या २१ व्या कायद्यानुसार क्रमांक २७५८ वर मुंबई सार्वजनिक न्यास कायदा १९५० अन्वये क्रमांक एफ ९९१ वर पंजीकृत करून घेतली. ' सेवा परमोधर्म: ' हे या मिशनचे ब्रीदवाक्य ठरविले.[१८]

१. भुकेल्यांना अन्न :

हा गाडगेबाबांचा पहिला मानवतावादी संदेश आहे. प्राणीमात्रांच्या प्राथमिक गरजापैकी अन्न ही एक प्रमुख गरज आहे. भाकरी म्हणजे भुकेलेल्यांना देव असतो हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांनी भुकेलेल्या माणसाला आपल्या कार्याचे आराध्य दैवत मानले.

"देने को अन्नदान | लेने को हरिनाम ||

तरने को लीनता | डुबने को अभिमान ||[१९]

या संत कबीरांच्या दोह्याचा विचार गाडगेबाबांनी केलेला होता. गाडगेबाबांच्या विचाराने प्रभावित झालेल्या व्यक्तींकडून गाडगेबाबांच्या कार्यासाठी लाखो रूपयांची देणगी मिळत होती. त्यातून त्यांनी शेकडो लोकांना बुंदी लाडवाचे जेवण दिले. पण स्वत: मात्र झुणका भाकर खाऊन आयुष्य काढले. गाडगेबाबा नेहमी म्हणत असत, की भोवताली पसरलेली माणसाची दुनिया हे खरे देवाच रूप आहे. वासाचे फूल आणून दगडाच्या देवावर वाहण्यापेक्षा भोवतालच्या चालत्या-बोलत्या लोकांच्या तोंडात भाकरीचा घास घातला तर जन्माचे सार्थक होईल."[२०]

भुकेलेल्यांना अन्न देण्यासाठी गाडगेबाबांनी नाशिक, पंढरपूर, ऋणमोचन, त्र्यंबकेश्वर, मुर्तिजापूर, भायखळा-मुंबई, दादर, नागपूर, पुणे, आळंदी, देहू, ब्रम्हपुरी... इत्यादी. अनेक ठिकाणी धर्मशाळा स्थापन करून स्वत:च आचरणात आणला.[२१]

२. तहानलेल्यांना पाणी :

समाजामध्ये वावरताना तहानलेल्यांना साधे शुद्ध पाणी सुद्धा मिळत नाही, हे गाडगेबाबांनी पाहिले होते. पाणी म्हणजे जीवन, पाण्याशिवाय सजीवाचे अस्तित्व धोक्यात असते. गाडगेबाबांनी पाण्याचे महत्व ओळखले होते. त्याकाळात अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी घेऊ देत नसत. अनेक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पिण्याची पाण्याची योग्य सोय नसल्याने अंध, पंगु, रोगी, वयोवृद्ध भाविक-भक्तजन यांची होणारी

गैरसोय दूर करण्यासाठी त्यांनी ऋणमोचन (जि. अमरावती), मुर्तिजापूर (जि. अकोला), परतवाडा, दर्यापूर (अमरावती) अशा अनेक ठिकाणी पाणेरी (पाणपोई) बांधल्या.[२२]

**३. उघड्या - नागड्यांना वस्त्र :**

वस्त्रदान हा गाडगेबाबांचा तिसरा संदेश होता. गाडगेबाबा हे मानवतेचे चालते-बोलते विद्यापीठ होते. 'परोपकार' हे या विद्यापीठाचे कर्तव्य होते. गाडगेबाबांना समाजातील तळागाळातील लोकांविषयी तळमळ होती. उघड्यां-नागड्यांना लज्जारक्षणाला अंगभर वस्त्र मिळावे याविषयी त्यांच्या मनात कळवळा होता. गाडगेबाबा आपला विचार अतिशय मार्मिकपणे पटवून द्यायचे.

गाडगेबाबांच्या कार्याचाच एक भाग म्हणजे वस्त्रदान. हे त्यांच्या दि. २७.१०.१९५२ रोजी दादासाहेब देशमुख यांना लिहलेल्या पत्रातून दिसून येते. त्या पत्राचा तपशील खालीलप्रमाणे -

१. ब्लँकेट नग - १२ अंदाजे किंमत ५० रूपये, श्री. शेठ मेघराज घन:श्याम नागवाल, ठाकूरद्वार रोड, मुंबई - ४.

२. लुगडे नग - ९ अंदाजे किंमत १५० रूपये, श्री शेठ शहा लक्ष्मीचंद खजीभाई
साडीवाला, मुंबई.

३. मांजरपाट - ३८ वार अंदाजे किंमत ४० रूपये, श्री शेठ लालचंद दासाचंद गुप, मुंबई - ४.

४. धोती जोड्या - नग २ अंदाजे किंमत २० रूपये, श्री कुंदनमल सुरतराम नागपाल, मुंबई - ४.

याशिवाय १२ वार खाकी कापड त्याचे गुलाबसिंग व शिवदास या दोघांना फुल पँट व कोट करावा.[२३] अशा प्रकारे वस्त्रदानासाठी जमविलेल्या गोष्टींचा तपशील पाहिल्यावर गाडगेबाबांची समाजातील गरीब लोकांबद्दलची तळमळ आपल्याला जाणवते.

**४. बेघरांना आसरा :**

आसरा म्हणजे निवारा, घर. ऊन, वारा, पाऊस हिंस्त्र पशुपक्षापासून संरक्षण मिळविण्यासाठी निवाऱ्याची गरज असते. पण समाजातील गोर गरीबांना आजही निवारा मिळत नाही. समाजकारण्यांचे याकडे लक्ष नसते. पण गाडगेबाबांनी त्या काळातही बेघर लोकांच्या निवाऱ्याची गरज ओळखली होती. गाडगेबाबांना समाजात वावरत असताना घराशिवाय वावरणारे असंख्य बेघर दिसले. या माणसांना निवाऱ्याची आवश्यकता आहे हे त्यांनी स्वानुभवातून ओळखले. त्यातून अशा लोकांसाठी धर्मशाळा बांधण्याचा विचार त्यांच्या डोक्यात आला. हा विचार कृतीत आणण्यासाठी बाबांनी श्री गाडगेबाबा धर्मशाळा या नावाने नाशिक, भायखळा, मुंबई, नागपूर, पुणे, देहू, आळंदी, पंढरपूर इत्यादी. अनेक ठिकाणी मोठ मोठया धर्मशाळा उभारल्या आहेत.[२४] यावरून असे म्हणता येईल की, लोकांना आसरा देणारे गाडगेबाबा खरे 'दीनबंधू' होते. गाडगेबाबांच्या धर्मशाळा म्हणजे गरीब लोकांची 'दीपगृहे' होती.

**५. गरीब मुला-मुलींना शिक्षण :**

गाडगेबाबा स्वत: पूर्णपणे निरक्षर होते. त्यांनी परिस्थितीमुळे कधीही शाळेची पायरी चढली नव्हती. तरी त्यांनी जनता-जनार्दनासाठी व गरीब मुला-मुलींच्यासाठी अनेक ठिकाणी आश्रमशाळा, हायस्कूल, वसतिगृहे, पाळणाघरे काढली. एकदा एका गृहस्थाने गाडगेबाबांना विचारले, "गाडगेबाबा आपण शाळेचे तत्वज्ञान कुठे शिकलात? त्यावर गाडगेबाबांनी त्यांना उत्तर दिले, मायबाप, मी सडकेच्या शाळेत आणि दुनियेच्या विद्यापीठात शिकलो." विद्येचे महत्त्व सांगताना गाडगेबाबा म्हणायचे, "ज्याला विद्या नसेल, त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी चालेल, विद्या मोठं धन आहे. यातलेच मानसं दिल्लीच्या तख्यावर बसतात, भाशेन करतात अन् यातलेच माणसं बोरीबंदरच्या ठेसनावर पोते उचलतात. ते माणसं अन् हे कोण? हे काय बैल नाहीत ना? कोण आहेत? माणसं."

विद्येचे महत्व सांगताना म्हणायचे, "विद्या मोठं धन आहे. एकवेळ जेवणाचं ताट मोडा, बायकोला कमी भावाचं लुगडं घ्या, मोडक्या घरात रहा. पण मुलाले शिक्षण दिल्याविना राहू नका."[२५] तळागाळातील लोकांना शिक्षण दिले पाहिजे असे सर्व जण म्हणतात. पण त्या दिशेने पाऊले नाहीत हे सत्य आहे. पण गाडगेबाबा विचारानुसार प्रत्यक्ष आचरण व कृती करणारे होते. म्हणून त्यांनी श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना करून त्याद्वारे समाजातील मुला-मुलींना शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. आज मिशनद्वारे आदिवासी मुलांमुलींकरता - १४, आश्रमशाळा, भटक्या व विमुक्त जातींच्या मुलामुलींकरता - १२ आश्रमशाळा, तसेच १३ गाडगे महाराज पोष्ट बेसिकशाळा, १० गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृहे, २ कन्या छात्रालये, १ कन्या प्रशाळा, २ बालकमंदिरे, १ ज्युनिअर कॉलेज अशा अनेक शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत.[२६]

**६. बेकारांना रोजगार :**

'बेकाराईले रोजगार द्या' हा गाडगेबाबांचा महत्वाचा संदेश होता. रोजगार म्हणजे काम. गाडगेबाबांना कामाविषयी फार आवड होती. ते 'श्रमप्रतिष्ठेचे' पुजारी होते. गाडगेबाबांनी घर सोडल्यापासून शेवटपर्यंत अखंड ५० वर्षे समाजकार्याला वाहून घेतले.

'गात्याचा गळा आणि राबत्याचा मळा' अशी एक म्हण त्यांच्याबद्दल रूढ आहे. गाडगेबाबा कामाचं तत्वज्ञान सांगताना म्हणतात, 'काम केल्याविना फुकटचं कोणाचं खाऊ नका! काही ही काम करा. भांडी घासा, लाकडं फोडा, दगड वाहा, आणि मगच चार घरी मागून खा."[२७] श्रम केल्याविना फुकट मागून जगणाऱ्या लोकांबद्दल त्यांना फार चीड होती. गाडगेबाबांना त्यांच्या कर्ममार्गावर असंख्य अनुयायी मिळाले. त्यांनी सर्व अनुयायांना काम दिले. प्रत्येक बेकारांना काम मिळावे हाच त्यांच्या कार्य पद्धतीमागील मुख्य हेतू होता. यावरून गाडगेबाबांचा बेकारांना रोजगार हा संदेश किती वास्तव होता हे आपणास समजेल.

**७. अंध-पंगू रोग्यांना औषधोपचार :**

गाडगेबाबा विज्ञाननिष्ठ संत होते. ते दैववादी नव्हते. अंधश्रद्धाळू लोक घरात कोणी आजारी पडले की औषधोपचार करण्याऐवजी देवऋषीकडे जातात, अंगारा, धुपारा करतात, कोणीतरी करणी केलीय म्हणतात. पण डॉक्टरांकडे जात नाहीत हे गाडगेबाबांना दिसत होते. अशा अंधश्रद्धेविषयी बाबांना चीड होती. त्यामुळे गाडगेबाबा समाजाला नेहमी सांगायचे, "अरे आजारी पडला, रोग झाला तर डागतराकडे जावावं औशीद घ्याव, अचर-बचर खाल्लं अन् परसाकडे सुरू झाली, मग काय करावं? औशीद घ्यावं देवापुढं बकरं कापावं. पायाला फोड आला अन् डोक्यावर औशीद थापलं, फोड बरा होईल काय? नाही मग पहा बरं."[२८]

वरील उदाहरणासारखी असंख्य उदाहरणे कीर्तनातून देऊन अंध-पंगू -रोग्यांना अंधश्रद्धेला बळी न पडता विवेकाने औषधोपचार करावा हे पटवून देत. त्यांनी रोग्यांना औषधोपचार करण्यासाठी श्री गाडगे महाराज ट्रस्ट संचलित कमलाबा औषधालय, नाशिक येथे सुरू केले.

**८. पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय :**

गाडगेबाबांच्या मनात मुक्या पशुपक्ष्यांबद्दल अपार करूणा होती. बाबा म्हणायचे, "बाप हो, दया हा जगातला सर्वात मोठा धर्म आहे. गरीब प्राण्यांचे बळी देणे यासारखे पाप नाही. त्यांचे प्राण वाचविणे हे मोठे पुण्य आहे. गौतम बुद्धांच्या सारखी अहिंसा गाडगेबाबांच्यात होती. ते म्हणत,

"गाय कसाबासी देती | त्याच्या संसाराची माती ||"[२९]

अशी शिकवण देऊन ते समाजाला जागृत करत. मुक्या पशु-पक्षांना अभय देण्यासाठी गाडगेबाबांनी मुर्तिजापुर येथे गोरक्षण संस्थेची स्थापना करून प्रत्यक्ष कृती केली.

## ९. दु:खी निराशांना हिंमत :

दु:खी, निराश व्यक्ती अधोगतीला लागते. अशी व्यक्ती दु:ख निवारणासाठी व्यसनाहारी जाण्याची शक्यता असते. अशा दु:खी निराशांना हिंमत देण्याचे कार्य गाडगेबाबांनी केले. निराश माणसांबद्दल ज्यांच्या मनात कणव असते तेच निराशांना हिंमत देऊ शकतात. गाडगेबाबा कीर्तनातून सांगत असत, "आपल्या लेकराला रेशमी सदरा द्याल तर गोरगरीबाले मांजरपटाचा सदरा द्या, लेकराला चांदीचे ताटवाटी द्याल, तर गरीबाले कटोरा द्या."[३०] गाडगेबाबांनी निराशांना हिंमत देऊन यशस्वी करून दाखविले.

## १०. गोरगरीब मुला-मुलींचे लग्न :

लग्न म्हणजे दोन जीवांच्या मनोमीलनाचा क्षण असतो. गाडगेबाबांच्या काळात हुंडापद्धतीमुळे गोर-गरीबांच्या मुलींचे लग्न होणे अवघड होते, हुंडा पद्धतीविषयी त्यांना चीड होती, त्यामुळे गरीब लोक कर्जबाजारी होत त्यातून सावकार त्याची पिळवणूक करत म्हणून गाडगेबाबा साध्या पद्धतीने लग्न कसे करावे याचा समाजाला संदेश देत. त्यांनी खुद्द स्वत:च्या नातवाचे 'लग्न कसे करावे? हे दादासाहेब देशमुख यांना पत्र लिहून कळविले आहे. त्या पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर आहे. "आलोकाबाई (गाडगेबाबांची थोरली मुलगी) मुलाचे लग्न १५ रूपये. एक लुगडे, पाच मणी मंगळसूत्र, जेवण ज्वारीच्या भाकरी, वांग्याची भाजी, डाळ. संबंध लग्न १५ ते ३० रूपयांच्या आत आले पाहिजे. वऱ्हाडी ५-१०, लग्न दोन तासाच्या आत, संध्याकाळी वाजंत्री, एक सनई आणि चांगले डफडे, वऱ्हाडाचा, नवरा नवरीचा एक फोटो काढा, पाच-दहा परीट, पाच दहा आंधळे, पंगू तो एक फोटो काढा. नवरा-नवरी आणि हजर माणसे या सर्वाची नावे देऊन पेपरमधून जाहीर करा. यंदा एवढे लग्न होऊ द्या."[३१]

गाडगेबाबांचा लग्न कार्याविषयीचा अत्यंत विधायक दृष्टिकोन या पत्रातून स्पष्ट होतो. तसेच त्यांनी स्वत:च्या गोविंदा या मुलाचे लग्न अतिशय साधेपणाने केले होते. या लग्नात मुला-मुलीला हळद लावली आणि लग्नास उभे केले. दोघांकडूनही

एकमेकांच्या गळयात माळा घातल्या. संपले लग्न. जमलेली मंडळी नवरा-नवरीस आहेर द्यायचे बोलू लागली तेव्हा गाडगेबाबांनी त्यास नकार दिला. या लग्नाचा खर्च साडे-सात रूपये झाला होता.[३२]

अत्यल्प खर्चात लग्न कसे करावयाचे याचा आदर्श गाडगेबाबांनी स्वत:च्या मुलाच्या लग्नातूनच समाजाला घालून दिला.

## श्री गाडगेबाबांचे कार्य :

### संत गाडगेबाबांच्या कार्याचे जीवनसूत्र :

भूदान, संपत्तीदान, श्रमदान व जीवनदान या विनोबा भावे यांच्या चतुःसूत्रीचा गाडगेबाबांनी जीवन कार्याचे सूत्र म्हणून स्वीकार केला होता. त्यानी त्यांच्या कीर्तनाद्वावारे या चतु:सुत्रीचा प्रचार केला. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व इतर मोक्याच्या ठिकाणी गरजू लोकांसाठी धर्मशाळा बांधण्यासाठी जमीनदारांना जमिनी देण्यास प्रवृत्त केले, धनिकांना आपल्या जवळच्या संपत्तीतून अल्प स्वरूपात का होईना दान देण्यास भाग पाडले. समाजसेवेतून श्रमदान करण्यासाठी सेवकांची पथके निर्माण केली. श्रमदान पद्धती स्वकृतीतून सर्वांना पटवून दिली. राष्ट्रालाच नव्हे तर समस्त मानवजातीकरिता जीवदान करण्यास तयार असलेल्या शिष्यांची एक परंपरा त्यांनी निर्माण केली.[३३]

### कीर्तनाद्वावारे केलेले समाज प्रबोधन :

कीर्तन हे लोकशिक्षणाचे व समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. समाज प्रबोधनासाठी गाडगेबाबांनी कीर्तन हे माध्यम अखेरपर्यंत अंगिकारले. लोकशिक्षणाचे साधन म्हणून कीर्तन परंपरेला महत्व आहे.

### कीर्तनसंस्थेचा उदय :

महाराष्ट्रात कीर्तन संस्था ही एक प्राचीन सांस्कृतिक संस्था आहे ईश्वरभक्ती आणि चारित्र्य संपन्नता या दोन प्रमुख उद्दिष्टांसाठी कीर्तनसंस्था उपयुक्त ठरली. वक्तृत्व, संगीत, नाट्य, अभिनय, संवाद, विनोद हे कीर्तनाचे मुख्य घटक असतात.[३४] कीर्तन परंपरेचे आद्यजनक संत नामदेव आहेत.[३५]

गाडगेबाबांनी कीर्तन हा शब्द जगाला सन्मार्गाचा उपदेश करणे या अर्थी वापरला. कारण गाडगेबाबांचे प्रत्येक कीर्तन हे उपदेशात्मक होते.[३६]

**कीर्तनाचे प्रकार :**

कीर्तनाच्या प्रकृतीनुसार आणि त्यातील विषयानुसार त्याचे तीन प्रकार रूढ आहेत.

१. नारदीय कीर्तन : नारदीय कीर्तनात आख्यायिका रंगवून सांगतात.

२. राष्ट्रीय कीर्तन : राष्ट्रीय कीर्तनात ऐतिहासिक महापुरूषांच्या चरित्राचे गुण संकीर्तन असते.

३. वारकरी कीर्तन: वारकरी कीर्तनात संत अभंगाद्वारे भक्तीचे निरूपण व टाळमृदुंगात ईश्वर स्मरण असते.[३७]

**गाडगेबाबांचे कीर्तन :**

वरील प्रकारापैकी गाडगेबाबांचे कीर्तन वारकरी कीर्तन पद्धतीचे होते असे काहीजण म्हणतात. पण सूक्ष्म निरीक्षण केले असता असे दिसून येते की, गाडगेबाबांचे कीर्तन पूर्णपणे वारकरी कीर्तनपद्धतीचे तंतोतंत पालन करणारे नाही. कारण वारकरी कीर्तन आणि त्यांच्या कीर्तनात काही मूलभूत फरक होता. तो म्हणजे वारकरी कीर्तन परलोकीच्या सुखाचा विचार करणारे होते, तर गाडगेबाबांचे कीर्तन इहलोकीच्या दु:खाचे निराकरण करणारे होते. वारकरी कीर्तनात ईश्वरप्राप्तीला महत्व असते, तर गाडगेबाबांच्या कीर्तनात मानवप्रीतीला प्रधान स्थान होते. वारकरी कीर्तनात देवपण लाभलेल्या पुरूषांचे चरित्रकथन असे. गाडगेबाबांच्या कीर्तनात सामान्य माणसांच्या हृदयातील 'देवपणा' ला आवाहन केलेले असायचे. वारकरी कीर्तन धर्मसंकीर्तनावर भर देणारे असते, तर गाडगेबाबांचे कीर्तन हे कर्मसंकीर्तनावर भर देणारे असायचे.[३८] म्हणून वारकरी कीर्तनापेक्षा गाडगेबाबांच्या कीर्तनाची प्रेरणा, प्रकृती, विषय, अधिष्ठान आणि साधला जाणारा परिणाम हा भिन्न होता.

**गाडगे महाराज कीर्तनाची त्रिसूत्री :**

समाजशिक्षण, हितकारकधर्म आणि निष्कामधर्म ही त्रिसूत्री समोर ठेऊन गाडगेबाबा कीर्तन करायचे. त्यांचे कीर्तन समाज विकृतीचे जळमट नष्ट करणारे आयुध होते.[३९]

**गाडगेबाबांच्या कीर्तनाचे विषय :**

गाडगेबाबांनी सभामंडपात अडकून पडलेले कीर्तन उघडया मैदानावर आणले. गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून अंध:कारात चाचपडणाऱ्या, गरीबीने खचून गेलेल्या, व्यसनाने खंगून गेलेल्या, कर्जबाजाराने कंगाल झालेल्या, भुकेने व्याकुळ झालेल्या, अंधश्रध्देने वेढलेल्या आणि बेघर झालेल्या लोकांना आपल्या धारदार वाणीने चैतन्यमय बनवत. वेदनाग्रस्त समाजाविषयीचा कळवळा हाच त्यांच्या कीर्तनाचा आत्मा होता. म्हणूनच गाडगेबाबांनी कीर्तन कार्यातून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आणि शैक्षणिक क्रांती घडवून आणली.[४०]

**१. मूर्तीपूजा व नवस :**

मूर्तीपूजेबाबत गाडगेबाबा म्हणत मूर्तीपूजा ही भारत देशाला लागलेली कीड आहे. ते म्हणत, देव देवळात नाही, देव माणसात आहे. माणसाच्या सेवेसाठी मंदिराची व मूर्तीची गरज नाही. मूर्तीपूजा या देशातील महाघातक पाप आहे. त्या ऐवजी दीन-दुबळ्यांची अर्थात माणसात राहणाऱ्या 'परमपवित्राची' सेवा केली पाहीजे.

कपोलकल्पित दैवतांची निर्मिती करून भोळया भक्तांची फसवणूक थांबविण्यासाठी संत गाडगेबाबा कीर्तनात तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देऊन म्हणत,

'शेंदूर माखोनिया धोंडा | पाया पडती पोरे रांडा ||
देव दगडाचा केला | गंवडी त्याचा बाप झाला ||
देव सोन्याचा घडविला | सोनार त्याचा बाप झाला'||

सोडोनिया खऱ्या देवा | करी म्हसोबाची सेवा ||

"दगडाला चार दोन आण्याचा शेंदूर फासून बायका मुले घेऊन त्याच्या पाया पडता, तोंडात राख घालता ही काय बाप्पा तुमची अक्कल. दगडाची देवमूर्ती घडविणारे पाथरवट आणि सोन्या चांदीची मूर्ती घडविणारे सोनार देवाचे बाप का होऊ नयेत? चुकला रस्ता साफ चुकला, आपण खड्डयाकडे चालतो.

'वेड लागले जगाला । देव म्हणती धोंडयाला' माय बाप हो! जगात देव एकच आहे. तोच साऱ्या जगाची सूत्रे चालवितो बाकीचे सर्व नकली देव आहेत. मरीआई, बिरोबा, कडकलक्ष्मी, मसोबा यासारख्या देवांना तुम्हा आम्हा माणसासारख्यांनी बनविले आहे. बाप्पांनो ! देव माणसांना घडवितो. माणूस देवाला घडवू शकत नाही."[४१]

अशाप्रकारे मूर्तीपूजेवर गाडगेबाबा कठोर प्रहार करून जनजागरण करायचे.

**२. सत्यनारायण :**

श्रावण महिन्यात सत्यनारायण पूजा घालण्याची प्रथा हिंदू समाजात पूर्वी पासून आहे. गाडगेबाबा कीर्तनातून सत्यनारायणाच्या अनिष्ठ प्रथेवर प्रहार करत. ते म्हणत, "आता हा सत्यनारायण देव लोकांनी तयार केला आहे, चांगला सोईस्कर देव आहे बरं का, सव्वा रूपयात हवा तो नवस पार पाडतो. सव्वा रूपयात हल्ली मजूर कामाला मिळत नाही आणि मिळाला तर चोख काम करील तर हराम, पण हा देव तसा नाही, केला नवस बिनचूक पार पाडतो. मघाशी तुम्ही याची पोथी ऐकलीच असलं, त्या कलावती का लीलावतीच्या साधूवाण्याची बोट समुद्रात बुडाली, पार गेली रसातळाला त्याच बाईन सत्यनारायनाचा प्रसाद खाताच झटकन ती बोट वर आली, सुकीठाक ठणठणीत पाण्यावर काय? आहे का नाही या देवाचा चमत्कार?

गेल्या दोन महायुध्दात इंग्लड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिकेच्या शेकडो मोटमोठया बोटी महासागरात बुडल्या आहेत त्या बाहेर कढण्यासाठी ही सत्यनारायणाची

सोपी युगत अजून त्यांना कोणी सांगितली नाही कशी कोण जाणे. बंदरावर एक मोठा सत्यनारायण केला, त्याचा प्रसाद सगळयांनी खाल्ला का भराभर बुडालेल्या बोटी बाहेर येतील, येतील का नाही सांगा? ही लांबची विलायतेची भानगड राहू द्या. आपल्या जवळच्या मुंबई बंदरातच ती रामदास बोट बुडाली आहे.

बाप हो! माजी पैज आहे एक कोट रूपये देतो, कुणीही सत्यनारायणाच्या भगतानं आपोलो बंदरावर सत्यनारायनाची महापूजा करून ती बोट वर आणून दाखवावी. असं झालं नाही तर सत्यनारायण हा सुद्धा बाबांनो भोळसटांना ठकवून पैसा काढण्याचा एक लबाडीचा धंदा आहे. त्याच्या नादी लागू नका."[४२] असे स्पष्टपणे गाडगेबाबा सत्यनारायण करणाऱ्या भक्तांना सांगत व सत्यनारायणाचा फोलपणा कीर्तनातून अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट करत.

**३. नवसपूर्ती :**

आपल्या देशात मनातील इच्छापूर्ती करून घेण्यासाठी नवस बोलण्याची प्रथा आहे. हया प्रथेबाबत गाडगेबाबा कीर्तनातून उत्तम दाखले देऊन नवसपूर्ती प्रथेवर कठोर प्रहार करून नवस कसे चुकीचे असतात हे कीर्तनातून सांगताना ते म्हणतात - "मालक घरातून गेले की बायकांची पार्लमेंट भरते, तेथे कसल्या भरताड गप्पा निघतील त्याचा नेम नाही. एखादी भागूबाई, गंगूबाईला सांगते, "बया मला पदर आला तवापासनं चार वरसं झाली, सा वरसं झाली, पोराचा पत्त्या न्याय, त्या भिमा आजीनं सांगितलं का आपला वंश खंडोबापासन् वाढला, जा त्या देवाकडं नि करा त्याला नवस, फुकट दिवस कशाला घालवता? दुसऱ्याच दिशी कारभारी नि मी खंडोबा देवाकडं गेलो, नवस केला, अन् तवापसन् ना या गंप्या, चिंगी, नि बनी झाल्या, बगा बयांनो देवाच्या दरबारात बसलुया समदी आपण खोटं कशाला बोलायच? त्ये पहा समोर कारभारी बसल्याति इचारा त्यासनि हावं तर, खरं का न्हाय वो कारभारी! कारभारी पडला नंदी बैलाचा मावस भाऊ तो सरळ होकाराची मान हालवितो.

आता विचार करा माय बापांनो खंडोबापासनं जर पोर होतात तर नवरा कशाला? कुण्याही बाईनं उठावं, देवळात जावं देवाला सांगून चार पाच पोरं आणि दोन पोरी घेऊन यावं, सोपा कारखाना जमलं का हो? ( नाही नाही ) नाही ना? मग नवसानं पोरं झाली, नि होतात असं म्हणणाऱ्यांची माथी कशी पोकळ आहेत बर? पुढे ते तुकोबारायाचा दाखला देऊन म्हणतात.

नवसे कन्या पुत्र होती | मग का करणे लागे पती ||

देवाच्या नवसांच्या सबबीवर अशा शेकडो मुर्खपणाच्या गोष्टी आपण करीत असतो त्या चुका आपण सुधारल्या पाहिजेत, बाबांनो त्यापासून सावध व्हा.[४३] असा मार्मिक उपदेश ते कीर्तनातून करून समाजप्रबोधन करत.

**४. जादूटोणा आणि चमत्कार :**

जादूटोणे आणि चमत्कार हा समाजातील अनिष्ठ प्रकार होता व आजही आहे. जादूटोणे आणि चमत्कार यावर विश्वास ठेवणाऱ्यांची गाडगेबाबा विनोदपूर्ण शैलीत कीर्तनातून खिल्ली उडवायचे. ते म्हणत - "जादूटोणे करून अथवा मूठ मारून हवा त्याचा धुव्वा माणसाला उडविता येतो तर मग देवापेक्षाही माणूस मोठा म्हटला पाहिजे, लढयांत असले ८-१० मूठ मारणारे सोडले का काम भागले, कशाला हव्यात बंदूका, तोफा नि ते आटमबांब?" सगळया पोत्या-पुराणांत असेल चमत्कार रगड लिहले आहेत पण खरं काय, खोटं काय आपण उमजून घेतलं पाहिजे."[४४]

गाडगेबाबांच्या या जादूटोणा व चमत्कार प्रबोधनकार्याबद्दल श्री. सुधाकर सामंत म्हणतात "जादूटोण्यासारखे कोणतेच चमत्कार न करता एक निरक्षर आणि खेडवळ माणूस लक्षावधी लोकांना मंत्रमुग्ध करतो आणि समाजसेवेच्या हजारो कामांची प्रदीर्घ परंपरा निर्माण करतो हा देशातील महान चमत्कार नव्हे काय?"[४५]

**५. पशुबळी व हिंसाबंदी :**

आपल्या समाजात पशुबळी प्रथा मोठया प्रमाणात होती. ही प्रथा बंद

व्हावी यासाठी गाडगेबाबा जीवनभर झगडले. त्यांना या बाबतीत समाजाचा पाठिंबा नसतानाही त्यांनी भरीव कामगिरी करून दाखविली आहे. ते आपल्या कीर्तनातून पशुबळी व प्राणी हिंसेविरोधात जगजागरण करण्यासाठी अतिशय मार्मिक उदाहरणे देत.

गाडगेबाबा म्हणत, "देवांना नवस करता की नाही? करतो! अस म्हणता का नाही, की देवा माझं पोरग आजारी पडलं याले बर कर. तुले एक बकरू कापीन? म्हणतो असं सांगता का नाही, तुला चार पायाचं वाहीन तू हे दोन पायाचं सोडून दे! सांगतो, का बा? देवाले काय दोन पायाच कडू लागते काय? अन् ज्यान पुर्थई ( पृथ्वी ) पैदा केली थो देव इतका लालची, लाचखाऊ आहे काय? असा कसा तुमचा देव! घेतो बकऱ्याचा जीव! थो काय चपराशी आहे काय? नाही! 'अरे ज्यानं हे जग पैदा केलं त्याला लालूच दाखवता देवापुढे बकरू नेहता. त्याला देवासमोर खाली पाडता. त्याची मान धरून पिरगळता. त्यावर कसायाची सुरी चालवता धड अलग मुंडक अलग, रक्ताचा इथून तिथंवर पाट वाहाते वाहते का न्याय? वाहते आन् मग रक्ताची पाच बोटं देवाच्या अंगावर उठवता थे बकरू सोलता, कापता, तुकडे करता, शिजवता मग पंगत जेवायला बसते. भिकोबा, गंगोबा, सखाराम, तुकाराम, बकाराम... आग्रह करू करू वाढता पोटाला तडस लागेतोपर नळया ओरवता! बोला हो!

अन घरी निघताना देवाला म्हणता, का देवा आमचं आणि पोरांच कल्यानं कर देव कल्याण करील तुमच? थो सत्यानाश करील!

अरे देवाच्या घरच एक बिचार कापून खाल्ल, अन त्याले पुन: कल्याण कयाले सांगता? तुमचं कधी बर होणार नाही.[४६]

अशी मार्मिक टिप्पणी करून पशुहत्या केल्याने तुमचं भलं न होता वाईटच कसं होईल याचा दाखला देवून पशुबळी व हिंसा बंदीसाठी ते प्रबोधन करीत. स्वत: गाडगेबाबांनी व त्यांच्या अनुयायांनी अमरावती जिल्हयातील उपराई, आकोला

जिल्हयातील उपराई, वरवंडीची मरीआई, निंबगावची देवी, देवदहीठाणचा खंडोबा, वडणीचा पीर, वाई तालुक्यातील मांढरदेवी, भगूरचा खंडोबा इत्यादी अनेक ठिकाणी होणारी पशुबळी प्रथा बंद करण्याचे प्रयत्न केले होते.[४७]

**६. देवासमोर पैसा व फुले ठेवण्याच्या प्रथा :**

भारतीय समाजामध्ये देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी व मनोकामना पूर्णत्वाकडे नेहण्यासाठी देवापुढे पैसे, फुले, फळे, नैवेद्य, ठेवण्याठी प्रथा आहे. पण गाडगेबाबांचा या गोष्टींना पूर्णपणे विरोध होता. ही प्रथा कशी चुकीची आहे हे सांगताना कीर्तनातून उपदेश करताना म्हणत, "लोक हो देव मोठा की आपण मोठे? (देव मोठा) मग सर्व काही देवाने आपल्याला दयायचे का आपण देवाला? (देवाने आपल्याला दयाचे) देव आपल्याला देतो तर मग देवाकडे पैसा का ठेवता? फळे का ठेवतो? हा देवाचा अपमान आहे अपमान! देवापुढे पैसे ठेवणारे लोक मोठे धोकेबाज नि हुशार असतात. देवाच्या पाया पडायला जातो नि नमस्कार करून पुढे काय ठेवतो? तर एका भोकाची दिडकी आपल्या खिशात शंभर, दहा, पाच रूपायाच्या नोटा असलेल्या देवाला काय माहित नसतात का हो? सगळा अस्सल माल आपला व रद्दी तेवढी देवाची हा न्याय कुटला हो बाबांनो?... बाबांनो देवापुढं पैसा आडका, फळफळाव ठेवू नका, देवाला नवस करू नका, केले असतील तर देऊ नका. भोळया भक्तांना स्वत:च्या जाळयात आणि देवाच्या लफडयात अडकू नका. देव दैवत नसून पूजाऱ्यांची ती अल्प भांडवली दुकाने आहेत त्यात फक्त घेण्याचाच सौदा असतो, देण्याचा नसतो. असल्या फंदयात पडू नका."[४८] अशा प्रकारचे अनेक सल्ले गाडगेबाबा कीर्तनाद्वारे देत होते व समाजप्रबोधनाचे कार्य करत होते.

**७. दारूबंदी :**

गाडगेबाबांना स्वत:च्या घरच्या परिस्थितीवरून दारूच्या दुष्परिणामाचा अनुभव आला होता. म्हणून संसाराची राख रांगोळी करणाऱ्या या व्यसनापासून दूर

राहण्यासाठी कीर्तनातून आयुष्यभर उपदेश करून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. दि. ८ नोव्हेंबर १९५६ रोजी पोलीस स्टेशन बांद्रा, मुंबई येथील अखेरच्या कीर्तनात दारूच्या व्यसनाविरोधी मार्गदर्शन केले आहे. ते पुढीलप्रमाणे -

"आता सरकारचा उपदेश आहे दारू पिऊ नका, कुणाचा सरकारचा! ज्या दारूने करोडपतींचा खाना खराबा केला, राजपुत्र मारले, राजवाडे ओसाड पडले. त्या दारूच्या सावलीत सुध्दा उभे राहू नका, मुलानो ज्याचा बाप दारू पीत असेल कोण? बाप आन तो बाप दारू पिऊन सापडला त्याच बापाचं नात वालं ठेऊन द्या. तो बाप नाही वैरी आहे, अन् जा त्याच्या अंगावर, धरा त्याची शेंडी अन् काढा पायातला बुट असा बडवा की धोतर भरल्याशिवाय त्याला सोडूच नका तर तुम्ही मुलं नाही तर तुम्हाले खालमाने मेंढरं म्हटलं तरी चालेल... आपला बाप लेका दारू पिऊन आला. बडविल्याविना सोडूच नका. त्याची भीड करू नका बडवाल तर बडवा. आणखी पोलीसांच्या हातात द्या. दारू पिईल तो बाप नाही लाखो धन्यानं आपल्या आजाच्या, बापाच्या हातच्या जमिनी पार गमावल्या आणि हमाली करून राहिले हमाली हे पिऊन पडणारे मुर्दाड पहिलवान मराठे, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार, कोष्टी, बेलदार, लोहार, कैकाडी, गोंड, गवारी, झणकर, धनगर, मांग आणि महार...

मारवाडी दारू पिऊन बंबईत पडला पहिला का? नाही! गुजराती दारू पिऊन बंबईत पडला पहिला का? नाही! ब्राम्हण दारू पिऊन कचेरीत पडला पहिला का? नाही! जे जे दारू पितील त्यांचा खाना खराबा झाल्याविने कधी राहणार नाही." [४१]

दारूबंदीसाठी गाडगेबाबा गावोगावी जाऊन आयुष्यभर प्रयत्न करीत होते हे आपणास वरील उदाहरणावरून दिसून येते.

अशाप्रकारे गाडगेबाबांनी अखंड ५० वर्षे दारूबंदी, हिंसाबंदी, अंदश्रद्धा, नवस, जादूटोणे, अस्पृश्यता, हुंडाबळी, नरबळी, स्वच्छता, सत्यनारायण अशा अनेक समाजविघातक रूढी, परंपराविरूध्द आवाज उठवून समाज प्रबोधनाचे कार्य केलेले दिसते. गाडगेबाबांची कीर्तन पद्धती श्रोत्यांना मोहिनी घालत असे. प्रबोधन लोकांना रूचे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्यामुळे त्यांच्या कीर्तनाला प्रचंड गर्दी व मागणी असायची हे त्यांच्या कीर्तन कार्यक्रमाच्या पुढील तपशीलावरून दिसून येईल -

**गाडगेबाबांच्या कीर्तन कार्यक्रमाचा तपशील :**

| दिनांक | गाव | तालुका | जिल्हा | तपशील | |
|---|---|---|---|---|---|
| २.५.१९५३ | गिरड | हिंगणघाट | वर्धा | कीर्तन | अन्नदान |
| ४.५.१९५३ | दहिगांव | हिंगणघाट | वर्धा | कीर्तन | अन्नदान |
| ५.५.१९५३ | भारसिंगी | कटोल | नागपूर | कीर्तन | - |
| ६.५.१९५३ | देसाईगंज | गडचिरोली | चांदा | कीर्तन | अन्नदान |
| ८.५.१९५३ | चापटी | साकोळी | भंडारा | कीर्तन | - |
| ९.५.१९५३ | सावंगी | साकोळी | भंडारा | कीर्तन | - |
| १०.५.१९५३ | हेमला | गोंदिया | भंडारा | कीर्तन | अन्नदान |
| १२.५.१९५३ | चिचोळी | दर्यापूर | अमरावती | कीर्तन | अन्नदान |
| १३.५.१९५३ | जवलापूर | दर्यापूर | अमरावती | कीर्तन | अन्नदान |
| १५.५.१९५३ | कार्टपूर्णा | मुर्तिजापूर | अकोला | कीर्तन | - |
| १६.५.१९५३ | कंजार | मुर्तिजापूर | अकोला | कीर्तन | - |
| १८.५.१९५३ | शिराला | आकोला | अकोला | कीर्तन | अन्नदान |
| १९.५.१९५३ | खामगांव | खामगांव | बुलढाणा | कीर्तन | - |
| २०.५.१९५३ | लोणी | चिखली | बुलढाणा | कीर्तन | - |
| २१.५.१९५३ | सावरगांव | चिखली | बुलढाणा | कीर्तन | - |
| २२.५.१९५३ | तळगी | मलकापूर | बुलढाणा | कीर्तन | - |
| २४.५.१९५३ | भुसावळ | भुसावळ | पू.खानदेश | कीर्तन | - |
| २७.५.१९५३ | अंमळनेर | अंमळनेर | पू.खानदेश | कीर्तन | - |
| २९.५.१९५३ | उमरी | अकोला | पू.खानदेश | कीर्तन | - |
| ३१.५.१९५३ | कोकार्डा | दर्यापूर | अमरावती | कीर्तन | अन्नदान |

वरील तपशिलावरून गाडगेबाबांची कीर्तने किती प्रभावी असतील हे स्पष्ट होते.[५०] गाडगेबाबांचे कीर्तन म्हणजे त्यांनी सांगितलेल्या दहा संदेशाचे सार असायचे.

**गाडगेबाबांचे अनुयायी कीर्तनकार :**

प्रबोधनाची पताका खांद्यावर घेऊन गाडगेबाबा महाराष्ट्रभर फिरले. शिक्षण, समता, पशुबळी, जातीयता, नवस तापास, स्वच्छता, हिंसाबंदी या गोष्टी कीर्तनातून सांगत. या गोष्टींवर आवाज उठविण्यासाठी त्यांच्या कीर्तनाचा प्रभाव पडलेले अनेक कीर्तनकार अनुयायी तयार झाले. या कीर्तनकार अनुयायांमध्ये झेबुजी पाटील, मुर्तिजापूर तालुक्यातील मोरगावचे राजाराम पाटील, चिंचवडे म्हातारबा कुभांर, महानंदस्वामी यशवंतराव माने, विश्वनाथ वाघ, सोहोलीचे जिजाबा मोहिते, रामचंद्र शेलार (१९४२ च्या अंदोलनात सहभाग), गोपाळ जोशी, गो.नी.दांडेकर, नारायण कळसकर, शंकरराव बं वंजारी, भास्कर गुरव, वासुदेवराव सोनवणे, रामदास आमटे, सखारामबापू कैकाडी, कुशाबा तनपुरे म्हणजेच कैकाडी महाराज इत्यादी कीर्तनकार गाडगेबाबांच्या विचार संगतीने महाराष्ट्राला लाभले.[५१] या थोर कीर्तनकारांनी आपआपल्या कीर्तनातून व्यसनाधिनता, व इतर वाईट रूढी यावर टीकेची झोड उडवून गाडगेबाबांच्या पश्चात समाज प्रबोधनाची ज्योत अखंड तेवत ठेवली.

**रचनात्मक - सामाजिक कार्य :**

श्री संत गाडगेबाबांचा महाराष्ट्राच्या सामाजिक कार्यामध्ये सिंहाचा वाटा आहे. गाडगेबाबांनी केलेले सामाजिक कार्य विशाल व अफाट आहे तसेच ते चिरकाल टिकणारे आहे. त्यांनी केलेले कार्य करण्यास सरकाराला अनेक पंचवार्षिक योजनेत तरतुद करावी लागली असती. ते गाडगेबाबांनी जनता जर्नादनाच्या सहकार्यातून करून दाखविले. यासाठी ते ५० वर्षे कण कण झिजवून साऱ्या महाराष्ट्रात वणवण भटकले, कणा कणांनी त्यांनी कोट्यावधी रूपये जमविले. त्याचा उपयोग महाराष्ट्रात अद्वितीय अशा सामाजिक कार्यासाठी केला.[५२] त्यांच्या रचनात्मक सामाजिक कार्याचा तपशिल पुढीलप्रमाणे -

**श्री क्षेत्र ऋणमोचन घाट व मंदीर : (इ.स.१९०८)**

तत्कालीन वऱ्हाड प्रांतात पूर्णानदीच्या काठी ऋणमोचन हे एक प्रसिद्ध तीर्थ क्षेत्र आहे. श्री गाडगेबाबांची जन्मभूमी याच भागात आहे. त्यांच्या वैराग्याचा उगम ऋणमोचन येथे झाला होता. जन्मकार्याचा ऋणातून मुक्त होण्यासाठी व सामाजिक कार्याची सुरूवात करण्यासाठी त्यांनी ऋणमोचन या ठिकाणची निवड केली होती. ऋणमोचन येथे दरवर्षी पौष महिन्यात प्रत्येक रविवार मोठी यात्रा भरते. येथील नदीचे पात्र अरूंद आणि कडे उंच व काळया चिकण मातीचे आहेत. नदीच्या उत्तर कडेला श्री मुदगलेश्वर महादेवाचे मंदिर असून यात्रा पूर्णा नदीच्या काठी दूतर्फा भरत असे. सकाळी स्नान करून ओल्याने महादेवाच्या पिंडीवर पाणी घालण्याच्या भाविक स्त्री पुरूष, यात्रेकरूंचा पूर्वापार रिवाज होता. त्यामुळे नदीच्या दोन्ही काठावरील रस्ते ओले होऊन यात्रेकरू पाय घसरून पडत. त्यामुळे कपडे खराब व्हायचे. प्रसंगी इजा ही होत असे. यात्रेतील हे दृश्य पाहून बाबांनी पूर्णानदीवर भाविकांच्या सोईसाठी घाट बांधण्याचा निश्चय केला. कीर्तनात गाडगेबाबांनी भाविकांना दयाळू, श्रीमंत लोकांना मदतीचा उपदेश केला. त्याचा लोकांवर परिणाम होऊन घाटाकरिता वर्गणी गोळा झाली. १९०८ साली नदीच्या दक्षिण कडेला घाट बांधण्यास सुरूवात केली. येथूनच गाडगेबाबांच्या रचनात्मक सामाजिक कार्याचा श्रीगणेशा झाला.[५३] या कामासाठी सांगवी दुर्गडे येथील गाडगेबाबांचे पूर्वाश्रमींचे सावकार श्रीमंत बनाजी प्रिथमजी तिडके आणि त्यांचे बंधू तुकाराम प्रिथमजी तिडके यांनी मदत केली हे विशेष आहे. पहिल्या घाटाकरिता ७५०० रूपये एकंदर वर्गणी जमली होती. या रक्कमेतून व जनतेच्या श्रमदानातून पहिला घाट इ.स.१९०८ साली पूर्ण झाला. वर्गणीच्या रक्कमेपैकी उरलेल्या पैशातून घाटाशेजारी श्री लक्ष्मीनारायणाचे एक मंदीर बाबांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन बांधले.

पूर्णानदीवरील दुसरा घाट उंबर्डे (जि.आकोला) येथील श्रीमंत गं.भा.पारूबाई, संभू आप्पा वाणी यांनी ५००० रूपये खर्च करून पहिल्या घाटच्या पश्चिमेस बांधला. तसेच नदीच्या उत्तरकडेला मुद्गलेश्वर मंदीराच्या समोर सांगवी दुर्गडे

येथे १९३३ साली १०७×३३ फुट आकारमानाचा प्रशस्त व मजबूत घाट बांधण्यात आला. यासाठी एकंदर खर्च ७५०० रू इतका झाला. चौथा घाट मुक्काम दढी (जि. अमरावती) येथील श्रीमंत दयाळूशेठ माणिकलाल व त्यांचे बंधू नारायण शिवभानजी मारवाडी यांनी २००० रूपये खर्च करून इ.स.१९३५ साली बांधला. हा नदीच्या दक्षिण तीरावरील तिसरा घाट होय.[५४]

ऋणमोचन येथे गाडगेबाबांनी यात्रेकरू व दुकानदार यांच्या सोईकरिता नदीच्या दक्षिण तीरावर लक्ष्मीनारायण मंदिरातील ६ एकर क्षेत्रफळाचे एक शेत १७०० रूपयास विकत घेतले आणि लक्ष्मीनारायण मंदिराच्या बाजूस २६×१४ फुट टीन पत्र्याची दुपाखी इमारत बांधली. या ठिकाणी गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची लग्ने दरसाल लावून दिली जात. वरील सर्व बांधकामे बाबांच्या प्रत्यक्ष सहभागातून व देखरेखीखाली झालेली आहेत. ऋणमोचन येथील या सर्व व्यवस्थेसाठी सन १९३६ मध्ये बाबांनी ट्रस्टची स्थापना केली व ट्रस्ट विश्वस्तांच्याकडे कारभार सोपविला.[५५]

ऋणमोचनचे महात्म्य म्हणजे येथूनच १९०५ साली गाडगेबाबांनी संसार त्यागानंतर सेवाकार्याची प्रेरणा मिळवली व सेवाकार्य सुरू केले. तसेच १९०७ साली व्यसनाधीन परीट समाजाचे संघटन करून ऋणमोचन क्षेत्रात नामसप्ताहाची व अन्नदानाची सुरूवात केली. ती आजतागायत सुरू आहे.[५६]

**परीट धर्मशाळा : ( इ.स. १९१४)**

श्री गाडगेबाबांच्या सल्ल्याने आमला या गावच्या परीट मंडळींनी वर्गणी गोळा करून पहिली परीट धर्मशाळा इ.स.१९१४ ऋणमोचन या ठिकाणी बांधली आहे. त्यामुळे यात्रेकरूंची सोय होण्यास मदत झाल्याचे दिसून येते.[५७]

**आजमेळा धर्मशाळा :**

गाडगेबाबांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनाखाली गाडगेबाबांचे अनुयायी ह.भ.प.मोतीराम पायरूजी आजमेळा या मांग जातीच्या व्यक्तीने प्रयत्नपूर्वक वर्गणी

गोळा करून आमला या गावी धर्मशाळा बांधली.[५८] मांग जातीच्या लोकांची यात्रेवेळी सोय व्हावी हा या धर्मशाळा स्थापनेमागचा हेतू होता असे दिसून येते.

## श्री क्षेत्र पंढरपूर :

**चोखामेळा धर्मशाळा पंढरपूर : (इ.स.१९१७)**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल हे महाराष्ट्राचे अराध्यदैवत आहे. येथे प्रत्येक वर्षी आषाढ कार्तिक महिन्यात यात्रा भरते. त्यासाठी लाखो भाविक पंढरपूरला येतात. एवढया मोठया जनसमुदायाची राहण्याची व्यवस्था होत नसे. तसेच समाजावर स्पृश्य-अस्पृश्यतेचा प्रभाव होता. त्यामुळे अस्पृश्यांना मंदीर प्रवेश नसे. तरीदेखील अस्पृश्यजातीजमातीचे भाविक पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत असत. स्पृश्य जमातीच्या काही लोकांची सोय नातेवाईक व बडवे मंडळीकडे होत होती. यात्रेच्याकाळात भरपूर पाऊस पडायचा. चंद्रभागा नदी दुथडी वाहत असे.पावसामुळे अस्पृश्य भाविकांचे खूप हाल व्हायचे. हे गाडगेबाबा प्रतिवर्षी पाहत व अनुभवत होते. अशा लोकांच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी एखादी धर्मशाळा बांधावी असा विचार त्यांच्या मनात आला. हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी त्यांनी कीर्तनातून धर्मशाळेची आवश्यकता व्यक्त केली.त्यासाठी पैशाची गरज होती. गाडगेबाबांनी आवाहन केल्यानंतर अनेकजण देणगीसाठी तयार झाले.शेवटी गाडगेबाबांनी समाजाने उपेक्षा केलेल्या वर्गातील लोकांसाठी पंढरपूरात धर्मशाळा बांधण्याचा सन १९१७ साली निर्णय घेतला. त्यासाठी पंढरपूरच्या पूर्वेस गोपाळपूर रस्त्यावर मोकळी जागा खरेदी करायचे ठरविले.[५९]

गाडगेबाबांनी चोखामेळा धर्मशाळेची आखणी केली. या धर्मशाळेच्या बांधकामाच्या देखरेखीसाठी यवतमाळ जिल्हयातील दार्भे गावचे जगोबा बोरकर आणि नागपूर जिल्हयातील अडयाळचे तुळशीराम फुलझेले यांची निवड केली. हे दोघेही चोखामेळांच्या म्हणजे महार समाजाचे होते. हिशोबकामासाठी व व्यवस्थापक म्हणून

रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर जवळील गणपत गांगण वाणी या व्यक्तीची निवड केली.[६०]

जनतेकडून देणग्या मिळाल्यानंतर पंढरपूर या ठिकाणी ५० हजार रूपये खर्च करून सर्वसोयी-सुविधांनी युक्त अशी भक्कम इमारत बांधली व तिचे चोखामेळा धर्मशाळा असे नामकरण केले. हया धर्मशाळेत चोखामेळा म्हणजे महार जातीच्या यात्रेकरूकरिंता ४ बाय २, ½ फुटांची ३१ कपाटे भिंतीत बसविलेली आहेत. दोन स्वयंपाक घरे बांधली आहेत. मोकळया जागेत पाण्याची टाकी व टाकीच्या सभोवताली फुल व फळ झाडे लावली आहेत. ही धर्मशाळा स्वच्छता, हवा पाणी व प्रकाश या दृष्टीने सोईस्कर आहे.[६१]

यात्रेच्यावेळी गाडगेबाबा येथे हजारो अस्पृश्य बांधवास ज्ञानामृताचे डोस देत असत. तसेच शिक्षणप्रसार, सामाजिक सुधारणा व हिंदू धर्मावरील श्रद्धा वाढविण्याचा प्रयत्न करीत. सदरच्या इमारतीचा ट्रस्ट केला आहे. यात्रेव्यतिरीक्तच्या काळात या इमारतीचा उपयोग मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहासाठी करतात. या इमारतीच्या बांधकामासाठी व बाबांच्या अस्पृश्यता निवारण कार्यासाठी अहमदाबाद येथील 'श्री रस्तु साहित्य-वर्धक कार्यालय' या संस्थेचे मालक स्वामी अखंडानंद यांनी सन १९३८ मध्ये रोख २५ हजार रूपायाची देणगी दिली होती.[६२]

जूलै १९४९ साली गाडगेबाबांनी ही धर्मशाळा तत्कालीन कायदामंत्री, दलितांचे थोर नेते व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाधीन केली.त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील व दिवाण बहादूर जगताप हे उपस्थित होते.[६३] आजही या धर्मशाळेचे कार्य सुरळीतपाणे चालू आहे.

**मराठा धर्मशाळा पंढरपूर : ( इ.स. १९२० )**

पंढरपूर हे भक्तीसांप्रदायचे आद्यपीठ, संताचे माहेर घर. येथे मराठा समाजाचे हजारो भाविक यात्रेसाठी येत. त्यांच्या राहण्याची सोय करण्यासाठी धर्मशाळा बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या कीर्तनाला येणाऱ्या भाविकांना गाडगेबाबांनी

मदतीचा उपदेश केला.[६४] भाविकांनी आपल्या कुवतीनुसार देणग्या दिल्या. देणगीदारांमध्ये पुण्याच्या मथुराबाई कंटक, जळगावच्या गंगूबाई शिंदे, नागपूरकडच्या गुजाबाई चव्हाण, नगरच्या सखुबाई पाडळकर या स्त्री देणगी दारांचा समावेश होता. तसेच सातारचे गोपाळ गुंडेवार, अकोल्याचे लालजी विठोबा पाटील इत्यादी अनेक देणगीदारांनी मराठा धर्मशाळेस मदत केली.[६५]

देणगीदाखल जमलेल्या पैशातून गाडगेबाबांनी स्टेशन रोडला लागून मोकळी जागा विकत घेतली. सन १९२० मध्ये बांधकामास सुरूवात झाली. या इमारतीचा आराखडा स्वत: गाडगेबाबांनी तयार केला. बांधकामासाठी मजुरांबरोबर श्रम केले. या इमारतीच्या मुख्य बांधकामासाठी १ लक्ष रूपये खर्च आला होता.[६६]

मराठा धर्मशाळेच्या बांधकामामध्ये ब्राम्हण, मराठा, साळी, माळी, कोष्टी, धनगर, महार, चांभार, लोहार, परीट इ. सर्व जातीजमातीच्या स्त्री-पुरूषांचा सहभाग होता.[६७] मराठा धर्मशाळेसाठी स्वत: गाडगेबाबांनी यात्रेकरूंच्या सोईसाठी ४ हजार रूपये किंमतीची भांडी घेतली होती. ती भांडी कोणाही यात्रेकरूंनी आपले नाव, पत्ता लिहून दिला असता मोफत वापरण्यास मिळतात. सदरच्या धर्मशाळेत १९२१ सालापासून अंध-पंगू सदावर्त ४० हजार रूपये खर्च करून सुरू केले आहे. या ठिकाणी अन्नासाठीच जगणे ज्यांच्या जीविताचे ध्येय अशा दु:खी, कष्टी आणि अंध-पंगू, स्त्री-पुरूषास जेवण देण्याची व्यवस्था केली आहे. साधू, बैरागी, वेदोनारायण यांना या ठिकाणी कोणत्याही सबबीवर जेवण दिले जात नसे. या अन्न सदावर्ततून (इ.स.१९३९) पर्यंत सुमारे ३ लक्ष निराश्रितांना अन्नदान करण्यात आले होते. तसेच अंध-पंगू, निराश्रित स्त्री-पुरूषांना वस्त्रदान व भांडीदान करण्यात येते. सन १९३९ पर्यंत सुमारे ६0,000 रूपये या दानाप्रित्यर्थ खर्च झालेला दिसून येतो.[६८] याशिवाय निराश्रित वृद्धांना झोपडया बांधून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच येथील अनाथ बालिकाश्रमात ज्या स्त्रिया येतात त्यांना अन्नदान, वस्त्रदान व आर्थिक मदत केली जाते.[६९]

मराठा धर्मशाळा या वैभवशाली धर्मशाळेची व्यवस्था ठेवणेसाठी गाडगेबाबांनी 'मराठा धर्मशाळा पंढरपूर विश्वस्त' या नावाचा ट्रस्ट निर्माण केला आणि पंढरपूर धर्मशाळा ट्रस्टच्या स्वाधीन केली. मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना ट्रस्टी करून घेतले व त्यांनी रोख १0,000 रूपयाची त्या ट्रस्टला मदत केली. या ट्रस्टमध्ये श्री गणपत गांगण, श्री नानचंद केशवराव गांधी (पंढरपूर), श्री विठ्ठलराव लक्ष्मण ठुबे (पुणे), वामनराव चिपळूणकर (पुणे), लक्ष्मणराव नारायणराव नेरूळकर (विलेपार्ले - मुंबई ), श्री केशवराव लालजी पाटील (अकोला) यांची विश्वस्त म्हणून निवड केली होती.

या विश्वस्तपत्रामध्ये गाडगेबाबांनी मुद्दामहून नोंद केली आहे की, "या मिळकतीवर माझेवारस, आप्त, शिष्य म्हणणारे ( मी कोणास शिष्य केले नाही) अगर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध नाही"

विश्वस्तपत्राच्या तळाशी आपल्या सहीचा अंगठा उठविला आहे. आणि ही धर्मशाळा जनतेच्या स्वाधीन करण्यात येत आहे असे नमूद केले आहे.[७०] आज ६0 वर्षाहून अधिक काळ लोटला तरी या धर्मशाळेचे काम सुरळीतपणे चालू असल्याचे दिसते.

**परीट धर्मशाळा पंढरपूर : (१९२५)**

श्री संत गाडगेबाबांनी इ.स १९२५ साली पंढरपूर या तीर्थक्षेत्री परीट धर्म शाळा सुरू केली. ती अनाथ बालिका आश्रमाच्या पूर्वेस बांधण्यात आली आहे. या धर्म शाळेचे वैशिष्टय म्हणजे सर्व वर्गणी परीट जातीच्या लोकांकडून जमा करण्यात आली होती. धर्मशाळेच्या खुल्या चौकात तुळशीवृंदावन आहे. त्याच्यासमोर विठ्ठल-रखुमाईचे मंदिर व गाडगेबाबांचा आरंभीचा फोटो बसविण्यात आला आहे.तसेच पडव्यांमध्ये कपाटे बसविली असून यात्रेकरूंचे साहित्य बंदोबस्ताने ठेवण्यासाठी याचा उपयोग होतो. उतारू

यात्रेकरूंना स्वयंपाकाच्या सोईसाठी १ हजार रूपये किंमतीची भांडी ठेवण्यात आलेली होती.[७१]

या धर्मशाळेच्या बांधकामास २५ हजार रूपये खर्च आलेला होता. या धर्म शाळेची व्यवस्था परीट समाजातील व्यक्तींकडे सोपविलेली दिसून येते.[७२]

**अजामेळा धर्मशाळा : पंढरपूर**

मातंग समाजाची पंढरपूर तीर्थक्षेत्री सोय व्हावी या उद्देशाने गाडगेबाबांनी धर्मशाळेची स्थापना करण्याचे ठरविले. या धर्मशाळेच्या बांधकामाची जबाबदारी श्रीमान दानवीर भागोजी बाळूजी कीर या कॉंट्रॅक्टरकडे सोपविली होती. त्यांनी ४० बाय २० फुटाचे टीन पत्र्याचे दुपारवी घरासारखी धर्मशाळा बांधली.[७३]

**कैकाडी धर्मशाळा : पंढरपूर**

गाडगे महाराजांचे परमभक्त राजाराम कैकाडी बुवा यांनी ही धर्मशाळा बांधण्यात पुढाकार घेतला होता. पंढरपूर येथे झेंडे गल्लीत ही धर्मशाळा बांधली असून ती त्यांनी गाडगेमहाराज मराठा धर्मशाळा ट्रस्टच्या स्वाधीन केली आहे. या धर्मशाळेचा उपयोग अस्पृश्य व कैकाडी समाजासाठी केला जात होता. तत्कालीन समाजामध्ये जातीव्यवस्थेचा प्रंचड पगडा असल्याने गाडगेबाबांना वेगवेगळया जातीजमातीकरिंता वेगवेगळया धर्मशाळा बांधाव्या लागल्याचे दिसून येते.[७४]

**वंजारी धर्मशाळा : पंढरपूर**

मराठा धर्मशाळा पंढरपूर या इमारतीचे पूर्वेस लागून दक्षिणोत्तर दिशेत ९० बाय ८० फुट जागेत वंजारी धर्मशाळा बांधण्यात आली आहे. ही धर्मशाळा बांधण्यासाठी पुणे जिल्हयातील भांडगी गावचे श्रीमंत उदार गुलाबराव वंजारी यांनी बाबांच्या आज्ञेवरून वंजारी जातीच्या लोकांकडून वर्गणी गोळा केली व स्वत: २००० रूपये देणगी दिली. या इमारतीचा खर्च वंजारी मंडळीनेच केला असल्याने तिला वंजारी धर्मशाळा असे नाव देण्यात आले आहे.[७५] ही धर्मशाळा बांधण्यास १५,००० रूपये खर्च आल्याचे दिसून येते.

**वंजारी धर्मशाळेची रचना :**

या धर्मशाळेच्या मागच्या बाजूस विहीर आहे. सभोवताली यात्रेकरूंच्या राहण्याची सोय करण्यात आली आहे. मोकळया जागेत एक छोटीशी बाग बांधण्यात आली आहे. यात्रेवेळी येथे धर्मार्थ दवाखाना असतो. या इमारतीच्या शेजारी खुल्या जागेत उत्तरेस कायम निराश्रित, निराधार अंध-पंगू लोकांना राहण्याकरिता झोपडयांची व्यवस्था केली आहे.

**सुखसोयी** - या धर्मशाळेस अनेक दरवाजे व खिडक्या असल्यामुळे नैसर्गिक हवा मिळते. यात्रेकरूंसाठी धर्मार्थ दवाखान्याची, पत्र पाठविण्यासाठी पोस्ट व तार ऑफीसची सोय करण्यात आली आहे. या धर्मशाळेत स्वयंपाकाची भांडी आहेत. या धर्म शाळेत यात्रेकरूंना जास्तीत जास्त ७ दिवस राहता येते.

यात्रेकरूव्यतिरिक्त ही धर्मशाळा गोरगरीब मुलामुलींच्या लग्नसमारंभास उपलब्ध करून देण्यात येते. ही धर्मशाळा गाडगे महाराज ट्रस्टकडे चालविण्यास दिली आहे.[७६]

**श्री क्षेत्र नाशिक**

**नाशिक धर्मशाळा :**

नाशिक हे महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान व तीर्थक्षेत्र आहे. तेथे रामनवमी व सिंहस्थांच्या मोठया यात्रा व कुंभमेळे भरतात. तेथे नेहमीच भाविकांची गर्दी असते हे बाबांनी पाहिले होते. प्रचंड भाविक संख्येमुळे भाविकांचे हाल होत असत. त्यामुळे भाविकांच्यासाठी धर्मशाळा बांधावी असा विचार गाडगेबाबांच्या डोक्यामध्ये आला होता. याचवेळी नाशिक नगरपालिकेचे अध्यक्ष आणि सभासद पंढरपूरला आले असता त्यांनी पंढरपूर येथील मराठा धर्मशाळा पाहिली. ती पाहून ते प्रभावित झाले आणि त्यांनी गाडगेबाबांना विनंती केली की, नाशिक हे देखील पंढरपूर सारखेच पुण्यक्षेत्र आहे. तेथे ही यात्रेकरूंची गैरसोय होते. आपण पंढरपूरमध्ये जसे यात्रेकरूंचे कष्ट दूर केले अशीच धर्मशाळा नाशिकला ही बांधावी.[७७]

त्यानंतर गाडगेबाबांनी या कामी पुढाकार घेतला. नाशिकमधील हनुमान गढीजवळ असलेल्या जागेची निवड केली. हनुमानगढीची सरासरी ९५३ चौरस यार्ड जागा सरकारकडून खरेदी केली. ही जागा ८६७ रूपयास कायम स्वरूपी खरेदी केली. तसेच हनुमानगढीच्या उत्तरेकडील पश्चिम कोपऱ्यात सरासरी २२ चौरस गुंठे जागा नाशिक म्युनिसिपल कार्पोरेशनकडे होती ती गाडगेबाबांनी त्यांचेकडून धर्मशाळेकरिता काही अटीवर ९९ वर्षाच्या कराराने घेतली.[७८]

गाडगेबाबांनी प्रथम लोकांच्या साहयाने जागेवरील निवडुंगाची दाट जंगले काढली. जागेवरील नगरपालिकेला कचरा काढला व ही जागा इमारत बांधण्यासाठी योग्य केली आणि सन १९३0 मध्ये नाशिक धर्मशाळा बांधली.[७९]

या धर्मशाळेसाठी ३ लाख रूपये खर्च आला होता. यासाठी धनिक मंडळींनी सढळ हाताने मदत केली होती. या मदतीमुळेच नाशिक हनुमानगढी जवळ दोन धर्मशाळा बांधल्या. त्यातील एक धर्मशाळा स्पृश्यांसाठी तर एक धर्मशाळा अस्पृश्यासाठी होती. तसेच तेथे इच्छुक यात्रेकरूना ज्ञानार्जन करण्यासाठी एक वाचनालय सुरू केले होते. त्याचप्रमाणे गोरगरीबांसाठी अन्नछत्र सुरू आहे.[८०]

**मराठा धर्मशाळा नाशिक :**

गाडगे बाबांनी मराठा (स्पृश्य) समाजाच्या सोईसाठी नाशिक येथे गोदावरी नदी काठी मराठा धर्मशाळा स्थापन केली. याशाळेच्या मैदानाचा उपयोग अंध पंगूंच्या जेवणाच्या पंक्ती व कीर्तन कार्यासाठी केला जातो. या धर्मशाळेचे स्वतंत्र ऑफीस आहे, धान्य साठविण्यासाठी तीन स्वतंत्र खोल्या आहेत. येथे येणाऱ्या यात्रेकरूंच्या सोईसाठी स्नान, भांडी व कपडे धुण्याची व्यवस्था केली आहे. इ.स १९३८ साली ही धर्मशाळा नाशिक नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आली.[८१]

## श्री क्षेत्र आळंदी

### परीट धर्मशाळा : (इ.स.१९३०)

आळंदी येथे ज्ञानेश्वर मंदीराच्या पश्चिमेस ही धर्मशाळा बांधली आहे. या धर्मशाळेसाठी परीट समाजाने वर्गणी जमविली होती. या इमारतीसाठी १५,000 रूपये खर्च आला होता. ही धर्मशाळा परीट ट्रस्टच्या स्वाधीन केली आहे.[८२]

### मराठा धर्मशाळा : ( इ.स. १९४० )

श्री संत ज्ञानदेवांच्या आळंदीमध्ये भाविकजन येतात. पंढरपूरच्या विठ्ठलाची आषाढीवारी आळंदी येथूनच सुरू होते. पण या ठिकाणी वारकऱ्यांच्या मुक्कामाची गैरसोय होती हे गाडगेबाबांनी पाहिले. पुण्याहून आळंदीला जात असताना गावात शिरण्यापूर्वी इंद्रायणीचा पुल लागतो. पुलाखालच्या डाव्या बाजूची जागा त्यांनी पाहिली. मनात धर्मशाळेचा आराखडा तयार केला. या बांधकामासाठी सावकरांच्या रत्नागिरीतील पतितपावन मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी ओळख झालेल्या दानशूर भागोजी कीरांची मदत झाली. तसेच त्यांनी यात्रेसाठी ८00 रूपये व दिवाबत्तीची सोय, झाडलोट, सदावर्त यासाठी प्रतिमहिना १00 रूपये या प्रमाणे वार्षिक २000 रूपये देण्याचे कबूल केले.[८३]

या धर्मशाळेसाठी मुंबई - माहिम येथील भागेश्वर भुवनचे मालक श्रीमंत शेठ भागोजी कीर यांनी गाडगेबांच्या आज्ञेवरून १ लाख रूपये दिले म्हणून या धर्मशाळेला 'भागेश्वर धर्मशाळा' असे ही म्हणतात. येथे नित्य सदावर्त चालू असते. तसेच यात्रेवेळी जमलेल्या अंध-पंगू स्त्री पुरूषांना ब्लँकेट आणि ज्येष्ठ आष्टमीस श्री ज्ञानदेवाची पालखी निघताना येथे जमलेल्या सर्व भाविक मंडळास पिठले-भाकरीचे जेवण देण्यात येते. इतर धर्म शाळांप्रमाणेच येथे ही यात्रेकरूंना स्वयंपाकासाठी भांडी देण्याची व्यवस्था केली आहे.[८४]

**श्री क्षेत्र देहू धर्मशाळा : (इ.स.१९३४)**

गाडगेबाबांच्या मनामध्ये संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्याविषयी अपार प्रेम होते. तुकाराम महाराजांच्या अभंगाचा त्यांच्यावर खूप प्रभाव असलेला आपणास त्यांच्या कीर्तनातून दिसतो. तुकाराम महाराजांची जन्मभूमी देहू होती. या देहूमध्ये फाल्गुन महिन्यात तुकाराम बीजेची यात्रा भरते. या यात्रेस वारकरी येतात. देहूस बडवेमंडळी नाहीत. तुकाराम महाराजांचे वंशज हेच तेथील तीर्थोपाध्याय आहेत, तेच यात्रेकरूंना आसरा देत. परंतु सर्वांची सोय करणे शक्य नसे. त्यामुळे भाविकांची दैन्यावस्था होत असे. ही गोष्ट गाडगेबाबांनी ओळखली. त्यावर तोडगा म्हणून त्यांनी देहू येथे धर्मशाळा बांधण्याचा निर्णय घेतला. इंद्रायणी नदीकाठी असलेल्या पडीक जमीनीची निवड केली. ती जमीन श्रीमंत बाबासाहेब इनामदार यांची होती. गाडगेबाबांच्या आज्ञेवरून त्यांनी १५० फुट लांब व १५० फुट रूंद अशी जागा विनामूल्य धर्मादाय दिली. तिथे गाडगेबाबांनी १९३४ साली धर्मशाळा बांधली.[८५]

**आकुल धर्मशाळा, पुणे :**

पुणे शहर हे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी व विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. नवमहाराष्ट्राच्या निर्मिती अगोदर वर्षातून सुमारे ४ महिने मुंबई राज्याचा कारभार पुण्यात चालत असे. त्या निमित्ताने अनेक गरीब लोक पुण्याला येत असत. त्याच्या राहण्याची सोय नसे. तसेच पुण्याच्या सरकारी रूग्णालयात (आताच्या ससून रूग्णालयात) संपूर्ण जिव्हाळयातील रूग्ण येत असत. त्यांच्या नातेवाईकांची मुक्कामाची सोय होत नसे. फुटपाथवर बसून रात्र काढावी लागे. अनेक गोर-गरीब मुले शिक्षणासाठी पुण्याला येत त्यांच्याही निवासाची व्यवस्था नव्हती. अशा मुलांची व गोरगरीबांची सोय व्हावी असा विचार पंढरपूरच्या धर्मशाळेचे एक ट्रस्ट श्री. चिपळोणकर (हे पुण्याचे) होते यांना सुचला. ही गोष्ट त्यांनी गाडगेबाबांच्या कानी घातली.

पुण्यातील सोमवार पेठेत गोसाव्यांची स्मशानभूमी असलेली एक मोकळी जागा 'नागाप्पा रामचंद्र आकुल' नावाच्या पोलीस अधिकाऱ्याच्या मालकीची होती.

त्यांच्याशी गाडगेबाबांनी बोलणी करून ही जागा बक्षिसी म्हणून मिळवली. दि.२२.९.१९३८ रोजी तिचे बक्षिसीपत्र केले.तसेच त्यांच्याकडूनच अर्थसाहय मिळवले. आणि दि ११ मे १९४० मध्ये आकुल धर्मशाळा गोरगरीब लोकांना, मुलांना व रूग्णांच्या नातेवाईकांच्या सोईसाठी सुरू केली. गरजू व्यक्तींच्या लग्न समारंभासाठी सुद्धा ही शाळा दिली जाते.[८६]

**त्र्यंबकेश्वर परीट धर्मशाळा : (इ.स १९४०)**

गाडगेबाबांच्या आज्ञेवरून परीट यात्रेकरूंच्या सोयीकरिता त्र्यंबकेश्वर या ठिकाणी इ.स १९४० मध्ये परीट धर्मशाळा बांधली आहे.

इ.स १९४० साली त्र्यंबकेश्वरला दुसरी धर्मशाळा 'कलाईवाली धर्मशाळा' या नावाने बांधली आहे.तसेच सातारा जिल्हयातील ब्रम्हपुरी येथे ही अशीच एक धर्म शाळा बांधली आहे.[८७] (ब्रम्हपुरी हे ठिकाण कोरेगाव तालुक्यात रहिमतपूरच्या जवळ आहे.)

**जे.जे.हॉस्पिटल धर्मशाळा मुंबई : (इ.स १९५३)**

मुंबई हे महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण. मुंबईमध्ये जे.जे. रूग्णालय आहे. तेथे उपचारासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रूग्ण येत असत. मुंबईत जागेचा तुटवडा असल्यामुळे रूग्णांबरोबर आलेल्या नातेवाईकांची गैरसोय होई. ही गैरसोय लक्षात घेऊन गाडगेबाबांनी जे.जे. हॉस्पिटलला लागून असलेल्या पारशी ट्रस्टची एक जागा मुख्यमंत्री बाळसाहेब खेर आणि तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ.गिल्डर यांच्या मदतीने मिळविली. त्यावेळचे बांधकाममंत्री राजेमालोजीराव निंबाळकर यांनीही गाडगेबाबांना सहकार्य केले. त्यामुळे इ.स.१९५३ मध्ये मुंबईसारख्या महानगरात एक मोठी तीन मजली धर्मशाळा स्थापन करणे शक्य झाले. श्रीमान शेठ महतलाल मेहता बेल्जिअमध्ये अँटपर्व शहरात राहणारे यांनी ही धर्मशाळेसाठी मदत केली. या धर्मशाळेचा वापर प्रामुख्याने रूग्णांच्या नातेवाईकांसाठी केला जातो. ही धर्मशाळा सर्व सोयी-सुविधांनी युक्त आहे.[८८]

अशाप्रकारे श्री संत गाडगेबाबांनी हयातभर गोरगरीबांच्या सेवा कार्यासाठी जवळजवळ २९ धर्मशाळा बांधल्या, लाखो रूपयाच्या संस्था स्थापन केल्या पण स्वत:च्या धर्मपत्नीला व मुलांना मोलमजूरी करून माधुकरी मागून जीवन व्यथित करण्यास भाग पाडले. आयुष्यभर स्वत: ही या संस्थांचा उपभोग घेतला नाही. गाडगेबाबांनी जनताजनार्दनाच्या आर्थिक सहकार्यातून मोठ्या राजवाड्यासारख्या प्रचंड धर्मशाळांचा पसारा निर्माण केला. धर्मशाळेत येणाऱ्या यात्रेकरूंना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये यासाठी धर्मशाळेतील सेवकांसाठी कठोर नियमावली केली इतकेच नव्हेतर अतिशय प्रामाणिकपणे ते सर्व नियम पाळले जातील अशी दक्षता घेतली.

## श्री संत गाडगेबाबांनी स्थापन केलेल्या ट्रस्टस् संस्था :

गाडगेबाबांनी हयातभर स्थापन केलेल्या धर्मशाळा, वृद्धाश्रम, अंध-पंगूसाठी सदावर्ते, गोशाळा, नदीवरील घाट... यांना संघटित रूप देण्यासाठी व आपले कार्य जनतेच्या सेवेसाठी सुरळीतपणे चालविण्यासाठी एकूण १७ ट्रस्टस् संस्था स्थापन केल्या. त्या पुढीलप्रमाणे -

१. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, नाशिक.

२. श्री गाडगे महाराज मराठा धर्मशाळा ट्रस्ट, पंढरपूर, जि.सोलापूर.

३. श्री गाडगे महाराज चोखामेळा धर्मशाळा ट्रस्ट, पंढरपूर, जि.सोल्हापूर.

४. श्री गाडगे महाराज परीट धर्मशाळा ट्रस्ट, पंढरपूर, जि.सोलापूर.

५. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, जे.जे. हास्पिटल, भायखळा मुंबई.

६. श्री गाडगे महाराज धर्मशाळा मेडीकल हॉस्पिटल, नागपूर.

७. श्री गाडगे महाराज आकुल धर्मशाळा ट्रस्ट, पुणे.

८. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, आळंदी, जि.पुणे.

९. श्री गाडगे महाराज परीट धर्मशाळा ट्रस्ट, आळंदी, जि. पुणे.

१०. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, देहू, जि. पुणे.

११. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक.

१२. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, मुर्तिजापूर, जि अकोला.

१३. श्री गाडगे महाराज परीट धर्मशाळा ट्रस्ट, आळंदी, जि. पुणे.

१४. श्री गाडगे महाराज लक्ष्मीनारायण संस्था, ऋणमोचन, जि. अमरावती

१५. श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट के. ई. एम. हॉस्पिटल, परेल, मुंबई.

१६. श्री गाडगे महाराज मिशन धर्मशाळा १/१७ दादासाहेब फाळके मार्ग, दादर मुंबई.

१७. श्री गाडगे महाराज मिशन धर्मशाळा ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर. [८९]

वरील संस्था आजही आपआपले कार्य सुरळीतपणे चालवत असल्याचे दिसून येते.

**अंध-पंगूसाठी सदावर्ते :**

गाडगेबाबांनी ५० वर्षे भटकंती केली होती. त्या भटकतींमध्ये त्यांनी समाजातील शारिरीक व्याधिनी, असाध्य रोगांनी पछाडलेल्या लोकांची दयनीय अवस्था पाहिली होती. अशा लोकांचे जीवन सुसाहय करणेसाठी गाडगेबाबांनी काही सदावर्ते सुरू केली. ती म्हणजे -

१. श्री गाडगे महाराज अंध-पंगू सदावर्त, नाशिक.

२. श्री गाडगे महाराज अंध-पंगू सदावर्त, मुर्तिजापूर जि. अकोला.

३. श्री गाडगे महाराज अंध-पंगू सदावर्त, ऋणमोचन जि. अमरावती.

४. श्री गाडगे महाराज अंध-पंगू सदावर्त, अमरावती. [९०]

या सदावर्तामार्फत रोग्यांची सुशुश्रा केली जाते तसेच त्यांना अन्न, पाणी, औषधे व राहण्याची मोफत व्यवस्था केली जाते.

**गोरक्षण संस्था :**

गाडगेबाबांना मुक्या प्राण्याबद्दल अपार करूणा होती. हिंदूधर्मात गाईला पवित्र स्थान आहे. गरीब परिस्थितीमुळे वृद्ध जनावरे संभाळणे लोकांना शक्य नसे. काही लोक वृद्ध जनावरांना कसायाला देत. ही प्रथा नाहीशी व्हावी अशी बाबांची इच्छा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

होती. यासाठी कीर्तनातून जनावरांना खाटीकांना, कसायांना विकू नका असा उपदेश करत. ते म्हणायचे "जनावरे म्हातारी झाली म्हणून कसाईला देता मग तुमचे बाप जर म्हातारे झाले तर तुम्ही कसाईल देता का?"

अशाप्रकारे प्रबोधनामुळे लोकांच्यात जागृती निर्माण झाली. लोक जनावरे कसायाला देण्याऐवजी सोडून देऊ लागले.[९१] अशा सोडून दिलेल्या व वृद्धजनावरांसाठी गाडगेबाबांनी कही गोरक्षण संस्था स्थापन केल्या

१. गाडगे महाराज गोरक्षण संस्था, मुर्तिजापूर जि. अकोला

२. गाडगे महाराज गोरक्षण संस्था, नागरवाडी जि. अमरावती.[९२]

मुर्तिजापूर येथील गोरक्षण संस्थेस जमादार नावाच्या शेतकऱ्यांनी ५६ एकर जमीन दिली होती. या गोरक्षणात जनावरांसाठी पाण्याचे हौद बांधण्यात आलेले आहेत. तसेच गोरक्षण सेवेसाठी असणाऱ्या सेवकांसाठी निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत.[९३] गोरक्षण संस्थेस अनेक दानशूर मंडळी सढळ हाताने मदत करतात. गाडगेबाबांनी गोरक्षण व्यवस्थेसाठी अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला दिसून येतो.

**पाणपोई :**

गाडगेबाबा सेवायोगी, कार्मयोगी संत होते. मानवी जीवनातील पाण्याचे महत्व त्यांनी ओळखले होते. पाणी म्हणजे जीवन पण हे पाणी सुद्धा काही लोकांना मिळणे कठीण होते. कारण समाजामध्ये अस्पृश्यांना होती. अस्पृश्यांचा पाण्याला स्पर्श झाला तरी विटाळ होतो. अशी समाजाची धारणा होती. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. अशा अस्पृश्य समाजातील लोकांचा व यात्रेसाठी जमा होणाऱ्या अंध पंगू रोगी, महारोगी, यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गाडगेबाबांनी काही पाणपोई बांधल्या. त्या पुढीलप्रमाणे -

१. श्री गाडगे महाराज पाणपोई, मुर्तिजापूर जि. अकोला.

२. श्री गाडगे महाराज पाणपोई, अमरावती.

३. श्री गाडगे महाराज पाणपोई परतवाडा, जि. अमरावती.

४. श्री गाडगे महाराज पाणपोई दर्यापूर, जि. अमरावती.

५. श्री गाडगे महाराज पाणपोई ऋणमोचन जि. अमरावती.[९४]

ह्या पाणपोई सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुल्या होत्या व आजही आहेत. या पाणपोई मधून तहानलेल्यांना तृप्त करणे हा जीवनधर्म असतो हे त्यांनी दाखवून दिले.

## संत गाडगेबाबांचे उपदेशात्मक कार्य :

### रयत शिक्षण संस्थेची बंद केलेली ग्रँट चालू करण्याबाबत :

आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील भगिरथ कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहूजन समाजाच्या शिक्षणकार्यासाठी 'रयत शिक्षण संस्था' स्थापन केली. कर्मवीर भाऊराव पाटील सत्यशोधक चळवळीचे खंदे कार्यकार्ते होते. महात्मा गांधीच्या खुनानंतरच्या दिवसात मुंबई सरकारने गांधीजींच्या खुनाचे कटकारस्थान करणरे लोक (नथुराम गोडसे) यांच्यावर टिका न करता "माझ्या रक्ताचा शेवटचा थेंब असेतोवर मी ब्राम्हणांचे संरक्षण करेन" अशी दर्पोक्ती दि.४ फेब्रुवारी १९४८ रोजी शनिवारवाडयापुढील भाषणात मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी काढली होती. त्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दुसऱ्या दिवशी साताराच्या जाहीर सभेत बाळासाहेब खेरांच्या या जातीयवादी दृष्टीकोनाचा खरपूस समाचार घेतला.

कर्मवीर आण्णा म्हणाले "खेर साहेब, ब्राम्हण समाजाला तुम्ही किती वाचविणार? त्यांचे खरे वाचविणारे हे बहूजन समाजातील लोक आहेत. त्यांनी जर त्यांना आश्रय दिला तर ते वाचू शकतील. अन्यथा त्यांची धडगत नाही! आणि तुमच्या अंगात किती रक्त असणार? फार तर २-३ लीटर, त्या रक्ताने किती ब्राम्हणांचे रक्षण होईल. हितशत्रूंनी या भाषणाचा विकृत वृत्तांत वर्तमान पत्रातून व खेरांना खाजगी भेटून सांगितला तो असा की "भाऊराव पाटील हे तुमच्या अंगातील रक्त बाहेर काढतो म्हणतात, तुमचा खुन करणार आहेत. अशा रितीने पराचा कावळा करणारे साताराचे पांढरपेशी लोक पुढे सरसावले. मुंबई सरकारने रयत शिक्षण संस्थेची काही लाखांची ग्रँट

बंद केली. त्यामुळे शिक्षकांचे पगार होत नव्हते. बोर्डिंगच्या मुलांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला होता. या बिकटप्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील गाडगेबाबांना भेटले. घडलेला वृतांत सांगितला.सरकार हा अन्याय करीत आहे हे गाडगेबाबांना पटले. कॉंग्रेसची प्रांतीक बैठक पुणे येथे भरली होती. खेरसाहेब व त्यांचे सहकारी तेथे जमले होते. गाडगेबाबा तिथे गेले. गाडगेबाबा आल्याचे कळताच खेर खाली येऊन त्यांना भेटले. त्यावेळी गाडगेबाबा त्यांना म्हणाले 'त्या साताऱ्याच्या बोर्डिंगची रक्कम काय म्हणून अडविली हो बाप्पा? ते गोरगरीबांच्या मुलांना ज्ञान देतात, पोटावर मारू नये, हवंतर पाठीवर मारावे! बघा काय करता येईल का?"

त्यानंतर खेर मंत्रिमंडळाने धूर्तपणे विचार करून कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेची ग्रँट पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला व ते पत्र सातारला ३० जानेवारी १९४९ रोजी म्हणजे म.गांधीच्या खुनानंतर बरोबर एक वर्षाने मिळाले.[९५] गाडगेबाबांच्या उपदेशात्मक सल्ल्यामुळे रयत शिक्षण संस्थेची बंद केलेली ग्रँट पुन्हा सुरू झाली. बहूजनांच्या शिक्षणाचा मार्ग खुला झाला. वरील उदाहरणावरून गाडगेबाबांच्या मनात गोरगरीब मुला-मुलींबद्दल आणि शिक्षणाबद्दल असणारी आस्था असल्याचे दिसते. तसेच थोरांमोठयांवर त्यांच्या कार्याचा व व्यक्तीमत्वाचा असलेला प्रभाव स्पष्ट होतो.

## डॉ.बाबासाहेब धर्मांतराचा निर्णय :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर गाडगेबाबांना गुरूस्थानी मानत असत. गाडगेबाबांनाही आंबेडकरांबाबत अभिमान होता. डॉ.आंबेडकर हिंदू धर्मातील जातीय व्यवस्थेच्या उतरंडीस कंटाळलेले होते. ते म्हणाले होते 'मी हिंदू म्हणून जन्मालो असेन, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' त्यांनी सर्व विचारांती इ.स. १९५६ मध्ये धर्मातर करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी कोणता धर्म स्वीकारावा याबाबत गाडगेबाबांना सल्ला विचारला डॉ.आंबेडकर गाडगेबाबांना म्हणाले, "बाबा आपण माझे गुरू आहात. एका बाबतीत मला आपला सल्ला पाहिजे. बोला, मला अडाऱ्याले उमगलं थे सांगतो"

"मी निश्चय केला आहे की हिंदू धर्म सोडून दुसऱ्या धर्माचा स्वीकार करायचा, बाबा मी खूप प्रयत्न केला, जन्मभर धक्के खात आलो, घटना बनविली म्हणून आपण माझं कौतुक करता मी शिकून डॉक्टर झालो तरी मला त्रास भोगावा लागला अन् माझे हे संगीसाथी ज्यांना विद्या नाही, जवळपास पैसा नाही, मान नाही, प्रतिष्ठा नाही त्यांना किती भोगावे लागत असेल! आपाल्याला हे सगळ माहित आहे. बाबा माझा निर्णय पक्का झाला आता कुठला धर्म स्वीकारू ते मला सांगा!"

गाडगेबाबा म्हणाले, "मले काय धर्माचे ज्ञान? मी आडानी धोबी बाबा आपल्याला फार कळते, आपण सांगाल ते मी करीन, माझ्याकडे रूपयांच्या थैल्या घेऊन माणस येताहेत, आमच्या धर्मात या म्हणून! गाडगेबाबा गप्प राहिले आणि थोडया वेळाने म्हणाले, हे पहा आंबेडकर साहेब, सगळी पद्दलित जमात तुमा मागं आहे, तुमी जो रस्ता दावान, त्या रस्त्यानं हे सगळे येतील त्याहिची तुमावर सरधा आहे, तुमच्या एका आक्षेरापायी हे लोक जीव टाकतीन याहिले भलत्या वाटेन नेहू नका"

"काय करू ?"

"ते तुमचं तुम्ही पाहेजा, इथलं सांगतो, देशा बाहेरून येणारे दोन रस्ते वगळा"

"बाबा मी आपली आज्ञा पाळीन, या देशात दोनच जाती सावध आहेत ब्राम्हण आणि महार. मी त्या सगळया महारांना घेऊन बौद्ध धर्मात जाईन. नागपूरास हा दिक्षाविधी व्हायचं ठरलं आहे. आम्हाला आशिर्वाद द्या". [९६]

गाडगेबाबा व डॉ.आंबेडकर यांच्या संभाषणातून असे दिसून येते की, गाडगेबाबांनी नको म्हणून सांगितलेल्या बाहेरच्या दोन वाटा म्हणजे इस्लाम आणि ख्रिचन धर्म या आहेत. त्यांना स्वदेशाभिमान होता.म्हणून त्यांनी या देशात जन्म पावलेला कोणताही धर्म स्वीकारा असे सांगितले होते हे स्पष्ट होते. त्याप्रमाणे डॉ.आंबेडकरांनी बाहेरच्या दोन वाटा वगळून बौद्ध धर्माचा स्वीकार केला.



16355

## संत तुकाराम गाथा व चरित्र :

प्रबोधनकारी विचारसरणीचे संत तुकाराम महाराज यांच्याबद्दल गाडगेबाबांच्या मनात आदर होता. गाडगेबाबा तुकारामांच्या अभंगाचे दाखले आपल्या कीर्तनातून देत असत. तुकाराम महाराजांचे कार्य बहुजनांपर्यत पोहचावे यासाठी गाडगेबाबांनी तुकाराम महाराजांची गाथा व चरित्र ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले.

त्यासाठी मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्याकडे आपली इच्छा व्यक्त केली आणि खेर साहेबांना म्हणाले "साहेब इतका खर्च तुम्ही करता हा इतुकासा नाई करणार? आणि एक गोष्ट करावी लागते."

'कोणती'

"तुकाराम महाराज सत्पुरूष, गाथा लिहून जगावर मोठा उपकार केला. सरकारातूनी गाथा काहून छापत ना? छापा आणि स्वस्त किंमतीले गोरगरिबांले द्या!

तुकाराम महाराजांची अभंगवाणी हे मराठी माणसाचे आणि महाराष्ट्राचे लोकधन आहे गाथा घेणे सामान्याला परवडणारे नाही. आपणच स्वस्त किंमतीत गाथा काढून हे लोकधन मराठी माणसाला दयायला हवे. हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव गाडगेबाबांच्या दोन शब्दांनी बाळासाहेब खेरांना झाली. त्यांनी लगेच व्यासंगी अशा पु.म.लाड यांना बोलावले, श्री लाडसाहेब बुद्धीमान कलेक्टर होते. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक संशोधन करून संत तुकाराम गाथा आणि चरित्र तयार केले आणि शासनाच्या वतीने ती दोन्ही पुस्तके अत्यंत कमी किंमतीत सामान्य जनतेला उपलब्ध करून दिली.[१७]

तुकारामांचे शब्दधन बहुजनांपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य गाडगेबाबांच्या मौलिक सूचनेमुळे घडू शकले असे म्हणावे लागेल.

**श्री गाडगेबाबांचे विचारधन :**

कर्मयोगी संत गाडगेबाबांचे विचारधन हे त्यांच्या जीवनानुभवातून आलेले आहे.

१. जातीभेद व पंक्तीभेद यानीच आपल्या लाखो बांधवांना पर धर्मात जावे लागले आहे आपण सर्व एकाच इश्वराची लेकरे आहोत. आपण साध्या माणूसकीलाही पारके झालो आहोत. मायबापांनो आता तरी जातिभेद दूर करा.

२. दारू आणि व्यसनापायी लाखो संसार धुळीला मिळाले. देवधर्मांच्या नावावर दारू पिऊन, हिंसा करून तर माणसाने माणुसकीच सोडली आहे. बाबांनो विचार करा व आता तरी माणुसकीत या .

३. देवासाठी संसार सोडून जाण्याची जरूरी नाही. देव संसारात राहून सुद्धा मिळतो. पण त्याला सेवा, त्याग, भूतदया व खऱ्या भक्तीची जरूरी नाही.

४. सहकार्याशिवाय व ऐक्याशिवाय कोणताही उद्योग यशस्वी होऊ शकणार नाही.

५. दुफळी करू नका, जेथे दुफळी आहे ते ठिकाण राक्षसी आहे. मरण मागा पण दुफळी करू नका.

६. मायबाप्पांनो घरी व गावात नेहमी स्वच्छता ठेवा. मुलामुलींना शिकवा अंध पंगू अनाथांना यथाशक्ती अन्न, वस्त्रदान करा.

७. बाप हो देवदेवींना नवस सायास करून त्यांच्या नावावर मुक्या प्राण्यांची हत्या करू नका, दारू, जुगार, बाई या व्यसनापासून दूर रहा.

८. विद्या मोठं धन आहे जेवणाचे ताट मोडा, बायकोला कमी भावाच लुगड घ्या, मोडक्या घरात रहा पण, मुलाला शिक्षण दिल्याशिवाय राहू नका.

९. मजूरासारखे कष्ट करा आणि मालकासारखे रहा.[१८]

**समारोप :**

कर्मयोगी संत गाडगेबाबांनी अखंड ५0 वर्षे समाजसेवा केली. अनेक संस्था स्थापन करून आपल्या कार्याला संघटित रूप दिले. त्यामुळे त्यांच्या कार्याची वाटचाल आज एकूण १३१ संस्थामार्फत चालू आहे. त्यांच्या कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्यांच्या 'श्री संत गाडगे महाराज मिशनला' महाराष्ट्र शासनाने सन १९८६-८७ चा 'दलितमित्र संस्था ' व सन १९८७-१९८८ चा 'आदिवासी सेवक संस्था' असे दोन पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

## संदर्भ साधने :


१. रसाळे उध्दव, निष्काम कार्मयोगी गाडगे महाराज, १९७६, पृ.- ७.

२. कित्ता, पृ.- १०.

३. कित्ता, पृ.- १९.

४. Shirwadkar Vasant, The wandering saint Gadagr Baba, P. 22, 23

५. भोसले द.ता., लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य, २००७, पृ.- १३, १४.

६. रसाळे उध्दव, उपरोक्त, पृ.- २४.

७. ठाकरे के.सी., श्री गाडगेबाबा, २००३, पृ.- १३.

८. रसाळे उध्दव, उपरोक्त, पृ.- २७, २८.

९. भोसले द.ता., उपरोक्त, पृ.- १६, १७.

१०. रसाळे उध्दव, उपरोक्त, पृ.- ६०, ६१.

११. कित्ता, पृ.- ६१, ६२, ६३.

१२. पोतदार वसंत, साधू भले ना मानो (श्री गाडगे बाबा की जीवन गाथा ), १९९४, पृ.- ३५.

१३. कवडे पां.बा., कर्मयोगी संत गाडगे बाबा, २०००, पृ.- १९८, १९९.

१४. भोसले द.ता., उपरोक्त, पृ.- २९५.

१५. कित्ता, पृ.- २९९, ३००.

१६. पाटणे संभाजीराव, माणुसकीचा नंदादीप श्री संत गाडगेबाबा, १९८२, पृ.-५४.

१७. Bhagat R.T., Sant Gadgebaba, 2006, P- 15

१८. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-१९९३, पृ.- १२.

१९. भगत रा.तु. (संपा.), संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, २००४, पृ.- ६९४.

२०. कित्ता, पृ.- ६९४, ६९५.

२१. पाठक सुनंदा (अनु. ), श्री गाडगेबाबा विचार धन, २००५, पृ.- ८५, ८६.

२२. कवडे पां.बा., उपरोक्त, पृ.- २११.

२३. भगत रा.तु.( संपा. ), श्री गाडगेबाबांची पत्रे, १९८५, पृ.- १७, १८.

तळटीप - दादासाहेब देशमुख हे मुळचे सिरसो मुर्तिजापूर जि.अमरावती येथील आहेत. ते १९२६ पासून गाडगेबाबांच्या सानिध्यात होते. ते काही काळ पंढरपूर येथील धर्मशाळेत सेवक म्हणून कार्य केले होते. या मिशनचे ते पहिले अध्यक्ष होते. त्यांचा मिशनच्या अध्यक्षपदाचा कालखंड इ.स १९५४ ते १९९० असा होता. दादासाहेब देशमुख मिशन संचलित अनेक शाखांचे संचालक होते.

२४. कवडे पां.बा., उपरोक्त, पृ.- २१०.

२५. दांडेकर गो.नी., श्री गाडगे महाराज, १९७६, पृ.- २४२.

२६. ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.- ११५, ११७.

२७. भगत रा.तु., गाडगेबाबांची काठी,२००३, पृ.- ८१, ८२.

२८. कित्ता, पृ.- ८३, ८४.

२९. कित्ता, पृ.- ८४, ८५.

३०. भगत रा.तु.(संपा.), उपरोक्त, पृ.- ७२१.

३१. कित्ता, पृ.- ७३३.

३२. दांडेकर गो. नी., उपरोक्त, पृ.- ११२.

३३. वेरूळकर उषा, संत गाडगेबाबा : व्यक्ती आणि कार्य, पृ.- ३५.

३४. कित्ता, पृ.- ४४.

३५. भगत रा.तु.(संपा.) , उपरोक्त, पृ.- १०४.

३६. वेरूळक उषा, उपरोक्त, पृ.- ४६.

३७. भोसले द.ता., उपरोक्त, पृ.- २३६.

३८. कित्ता, पृ.- २३६, २३७.

३९. कित्ता, पृ.- २३७.

४०. भगत रा.तु.(संपा.), पृ.- १०६.

४१. ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.- ६७ व भगत रा.तु.( संपा.), घरोघरी गाडगेबाबा, २००२, पृ.- २८.

४२. ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.- ६९.

४३. कित्ता, पृ.- ७०, ७२.

४४. कित्ता, पृ.- ७१.

४५. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १५०.

४६. दांडेकर गो.नी., उपरोक्त, पृ.- १५०, १६०.

४७. भगत रा.तु.(संपा.), घरोघरी गाडगेबाबा, पृ.- २८.

४८. ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.- ६९, ७०.

४९. गाडगे बाबांचे अखेरचे कीर्तन, ८नोव्हें १९५६, पृ.- १६.

५०. दांडेकर गो.नी., उपरोक्त, पृ.- १६५, १६६.

५१. देखने रामचंद्र., लोकशिक्षक गाडगे बाबा, १९९७, पृ.- ९१.

५२. रसाळे उध्दव, उपरोक्त, पृ.- १९८.

५३. जोशी ओंकारनाथ ( संपा. ), श्री गाडगे बाबा त्रैमासिक, ( जाने, फेब्रु, मार्च ) १९९८, पृ.- ५.

५४. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८४.

५५. जोशी ओंकारनाथ (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, ( जाने, फेब्रु, मार्च ) १९८५, पृ.- ६.

५६. कित्ता, पृ.- ७.

५७. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८४.

५८. कित्ता, पृ.- १८५.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

५९. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ७२, ७३, ७४.

६०. कित्ता, पृ.- ७६.

६१. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८७.

६२. कवडे पां.बा, उपरोक्त, पृ.- २०१.

६३. भगत रा.तु.(संपा.), उपरोक्त, पृ.- ५२६.

६४. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८५.

६५. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ७९.

६६. कवडे पां.बा, कर्मयोगी संत गाडगे बाबा, २००६, पृ.- १२५.

६७. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ७९.

६८. कवडे पां.बा., उपरोक्त, २००६, पृ.- १२६.

६९. कित्ता, पृ.- १२७.

७०. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ७९, ८०.

७१. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८८.

७२. कवडे पां.बा., उपरोक्त, २००६, पृ.- १२८.

७३. कित्ता, पृ.- २८.

७४. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८८.

७५. कित्ता, पृ.- १८६.

७६. कित्ता, पृ.- १८६, १८७.

७७. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८०.

७८. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १९१.

७९. महाजन र.न.(संपा.), सेवायोगी संत गाडगेबाबा, १९९९, पृ.- ५१.

८०. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८०.

८१. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १९२.

८२. कवडे पां.बा., उपरोक्त, २००६, पृ.- १२८.

८३. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८१.

८४. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १८९.

८५. देखणे रामचद, उपरोक्त, पृ.- ८२.

८६. कित्ता, पृ.- ८२.

८७. वेरूळकर उषा, उपरोक्त, पृ.- १९४.

तळटीप- गाडगे महाराज मिशनने ब्रम्हपुरी या गावी कार्य केले आहे. ब्रम्हपुरी हे ठिकाण सातारा जिल्हयातील कोरेगांव तालुक्यात रहिमतपूर शहरापासून ५ कि.मी.अंतरावर वसलेले आहे. या ठिकाणी गाडगेबाबांनी विठ्ठल रूक्मिणीचे मंदिर बांधले आहे. याच ठिकाणी गाडगे महाराज मिशनने एक आश्रमशाळा सुरू केली आहे.

८८. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८२, ८३.

८९. कवडे पां.बा., उपरोक्त, २०००, पृ.- २१०.

९०. कित्ता, पृ.२१०.

९१. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८५.

९२. ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.- ११४.

९३. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- ८५.

९४. कवडे पां.बा., उपरोक्त, २००६, पृ.- १३३.

९५. भगत रा.तु.(संपा.), लोकसंत गाडगे महाराज, १९९८, पृ.- ८५, ८६.

९६. कित्ता, पृ.- ५२७.

९७. देखणे रामचंद्र, उपरोक्त, पृ.- १०४- १०५.

९८. जोशी ओंकारनाथ (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक',
(आक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर) १९९१, पृ.- ७.